पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७४ ■ बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com



RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा





## जानेवारीअखेर शेतकऱ्यांना मिळणार पीकविमा?

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**सोलापूर:** सोलापूर जिल्ह्यातील सव्वादोन लाख शेतकऱ्यांचे सुमारे १४ कोटी रुपये होते. पीक कापणी प्रयोगानंतर आता अपेक्षित उत्पन्न, उंबरठा उत्पन्न आणि प्रत्यक्षात आलेल्या उत्पन्नाची माहिती केंद्र सरकारला पाठविण्यात आली आहे. राज्यातील ९४ लाख शेतकऱ्यांनी खरीप पिकांसाठी ५२६ कोटी रुपयांचा विमा हिस्सा भरला होता. त्यात सोलापूर जिल्ह्यातील सव्वादोन लाख शेतकऱ्यांचे सुमारे १४ कोटी रुपये होते. पीक कापणी प्रयोगानंतर आता अपेक्षित उत्पन्न, उंबरठा उत्पन्न आणि प्रत्यक्षात आलेल्या उत्पन्नाची माहिती केंद्र सरकारला पाठविण्यात आली आहे.

## वारसाहक्काने मिळालेली जमीन 'स्वतंत्र मालमत्ता', मुलांना दणका..

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**नागपूर:** मुलाला वडिलांकडून एखादी जमीन वारसाहक्काने मिळाली असल्यास हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ नुसार ती मालमत्ता त्या व्यक्तीची स्वतंत्र मालमत्ता मानली जाईल. ती मालमत्ता विकण्यासाठी तो स्वतंत्र आहे. त्याच्या मुलांना ही वडिलांची संपत्ती स्वत:ची मानता येणार नाही आणि त्या जमिनीची विक्रीदेखील रोखता येणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोंदविले. न्यायालयाने दाखल चार द्वितीय अपिलांवर एकत्रित निकाल देत कनिष्ठ न्यायालयाच्या निकालांना रद्द केले. या प्रकरणावर न्यायमूर्ती रोहित जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली.

## सोनं पुन्हा स्वस्त होणार! २०२६ मध्ये दरात मोठी घसरण?

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

सोन्याच्या किमतींबाबत गुंतवणूकदारांसाठी एक महत्त्वाचा इशारा समोर आला आहे. बाजारातील तज्ज्ञ आणि विश्लेषक २०२६ पर्यंत सोन्याच्या किमतीत लक्षणीय घट होणार असल्याचे म्हणत आहेत. या संभाव्य घसरणीचा परिणाम केवळ सोन्यावरच नाही तर संबंधित कमोडिटी मार्केट आणि एमसीएक्स म्हणजे मल्टी कमोडिटी एक्सचेंज शेअर्सच्या किमतींवरही होऊ शकतो. २०२५ वर्ष सोने गुंतवणूकदारांसाठी एक महत्त्वाचे आणि ऐतिहासिक वर्ष राहिले आहे. सोनं, ज्याला नेहमीच सुरक्षित गुंतवणूक मानलं जातं, यावर्षी इतका चांगला परतावा दिला की शेअर बाजारही मागे पडला.

# संभाजीनगरात भाजप इच्छुकांचा सलग दुसऱ्या दिवशी राडा

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**छत्रपती संभाजीनगर:** महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर भाजपमध्ये बंडाळीचा वणवा पेटला आहे. अनेक वर्षांपासून पक्षासाठी राबणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून नव्या चेहऱ्यांना संधी दिल्याचा आरोप करत आज कार्यकर्त्यांच्या संतापाचा उद्रेक झाला. आज दुपारी भाजपच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयासमोर शेकडो कार्यकर्त्यांनी 'तांडव' केले. यावेळी कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला कार्यकर्त्यांनी काळं फासून निषेध नोंदवला, तर डॉ. भागवत कराड यांची गाडी आंदोलकांनी रोखून धरली. परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली की, दोन्ही नेत्यांना पोलिसांच्या कडक बंदोबस्तात तिथून पळ काढावा लागला.



आंदोलनादरम्यान एका संतप्त कार्यकर्त्याने स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. 'आम्ही रात्रंदिवस पक्षासाठी झटलो आणि नेत्यांनी आमच्या पाठीत खंजीर खुपसला,' असा आक्रोश करत या कार्यकर्त्याने स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. कार्यकर्त्यांनी नेत्यांवर गंभीर आणि खळबळजनक आरोप केले आहेत. अतुल सावे यांनी स्वतःच्या पीएला आणि नातेवाईकांना तिकीट वाटल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. 'साहेबांच्या घरी येणाऱ्या-जाणाऱ्यांसाठी आम्ही लाखो रुपये खर्च केले, त्यांनी आम्हाला शेवटपर्यंत उमेदवारीचे 'लॉलीपॉप'

### निष्ठावंतांना डावलल्याचा गंभीर आरोप

'ज्या कार्यकर्त्यांनी पक्षासाठी लाठ्या-काठ्या खाल्ल्या, आंदोलने केली आणि पक्षाला शहरात मोठे केले, त्यांनाच आज उमेदवारी नाकारण्यात आली आहे,' असा आरोप यावेळी कार्यकर्त्यांनी केला. अनेक प्रभागांमध्ये विद्यमान नगरसेवकांचे तिकीट कापून तिथे नवख्या किंवा बाहेरून आलेल्यांना संधी दिल्याने निष्ठावंतांनी आता आरपारची लढाई पुकारली आहे. कालही दिव्या मराठे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी असाच पवित्रा घेतला होता, आज दुसऱ्या दिवशी हा संघर्ष अधिकच तीव्र झाल्याचे पाहायला मिळाले.

### भाजपच्या प्रतिमेला मोठा तडा

सलग दुसऱ्या दिवशी छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपचा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. ज्या कार्यकर्त्यांनी पक्षाला शून्यातून उभे केले, त्यांनीच आता नेत्यांविरुद्ध बंडाचे निशाण फडकवल्याने आगामी निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांना निवडून आणणे हे नेत्यांपुढे मोठे आव्हान असणार आहे. 'यांचे सर्व उमेदवार पडणार,' असा शापवजा इशाराही संतप्त महिला कार्यकर्त्यांनी दिला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या तिकीट वाटपावरून छत्रपती संभाजीनगर भाजपमध्ये सुरू असलेला उद्रेक आज सलग दुसऱ्या दिवशीही कायम होता. केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड आणि कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्याविरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. सावेंच्या गाडीला काळं फासणे आणि कराडांची गाडी रोखून धरल्याने निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी अखेर आमदार संजय केणेकर रिंगणात उतरले. यावेळी त्यांनी नाराज आणि इच्छुक कार्यकर्ता प्रशांत भदाणे याला सी फॉर्म देण्याचे आश्वासन देत शांत करण्याचा प्रयत्न केला.

दाखवले,' अशा तीव्र भावना महिला कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. डॉ. भागवत कराड यांनी केवळ 'वंजारी' समाजाला झुकते माप दिले असून इतर निष्ठावंतांचा बळी घेतल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. 'मी सर्वेक्षणात आघाडीवर होतो, मग तिकीट कापून पीएला का दिले? अतुल सावे यांनी आत्ताच्या आत्ता सर्व्हे समोर आणावा, जर मी त्यात मागे असेन तर मी त्यांची जन्मभर गुलामी करेन,' असे आव्हान भदाने पाटील या कार्यकर्त्याने दिले.संताप इतका अनावर होता की कार्यकर्त्यांनी सावे आणि कराड यांच्या फोटोंची होळी केली आणि त्यांना फाडून कचऱ्यात फेकले. नेत्यांचा उल्लेख एकेरी शब्दात करून शिवीगाळ करण्यात आली. 'भाजप कोणाच्या बापाचा पक्ष नाही,' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. दरम्यान, उमेदवारी नाकारल्याने व्यथित झालेल्या सुवर्णा मराठे यांनी कडाक्याच्या थंडीत प्रचार कार्यालयासमोरच आमरण उपोषण सुरू केले आहे.

## चाकू घेऊन फिरणारा आरोपी अटकेत!




**अमरावती :** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना गुप्त माहीती मिळाली की, एक इसम हा चाकु घेवुन सार्वजनिक ठिकाणी गुन्हा करण्याच्य उददेशाने उभा आहे. अशा मिळालेल्या माहीती वरून .पो.नि. संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर इसम नामे नामे निरज प्रविन नेवारे वय १९ वर्ष रा. समाधान नगर, अमरावती. यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु व एक चायना चाकु जप्त करून सदर इसमा विरुध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

## एका दिवसांत नगरसेवक झाले

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**मुंबई :** राज्यातील महापालिका निवडणुकांमध्येही भाजपने नगरपालिका निवडणुकांप्रमाणेच विजयी सुरुवात केली आहे. मतदानाच्या आधीच भाजपने विजयाचा चौकार ठोकला असून राज्यातील तीन महापालिकांमध्ये मिळून भाजपचे ४ उमेदवार विजयी झाले आहेत. कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकांसाठी मतदान होण्याआधीच भारतीय जनता पक्षाने आपलं विजयाचं खातं उघडलं आहे. भाजप उमेदवार रेखा चौधरी आणि आसावरी नवरे बिनविरोध निवडून आल्याची आहेत. रेखा चौधरी या दुसऱ्यादा निवडून आल्या आहेत, तर आसावरी नवरे यांची ही पहिलीच टर्म असल्याची माहिती आहे.

दुसरीकडे पनवेल महापालिका आणि विदर्भातील धुळे महापालिकेतही भाजपच्या प्रत्येकी एक-एक उमेदवार विजयी झाले आहेत.

राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मोठ्या घडामोडी घडल्या. काहींनी उमेदवारी मिळाली नाही म्हणून बंडखोरी केली, तर काहींनी मतदानाआधीच विजय मिळवला आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेत भाजपने २, पनवेलमध्ये १ आणि आता धुळे मनपात एक उमेदवार विजयी झाला आहे. पनवेल महानगरपालिकेत नितीन पाटील यांची बिनविरोध नगरसेवक पदी निवड झाली आहे. प्रभाग क्रमांक- १८ ( ब ) मधून हि निवड झाली आहे.

धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज छाननी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष असलेले रणजीत राजे भोसले यांनी काल तडकाफडकी पक्षाचा राजीनामा देत शेवटच्या क्षणी भाजपात प्रवेश केला होता आणि त्यांच्या धर्मपत्नी उज्वला भोसले यांना भाजपाचे तिकीट मिळवले होते. मात्र, आज अर्ज छाननी दरम्यान त्यांच्या विरोधात असलेल्या चारही उमेदवारांचे नामांकन अर्ज बाद झाल्याने त्या बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे, धुळे मनपातील 'त्या' पहिल्याच नगरसेविका म्हणून बिनविरोध निवडून आल्या आहे. विशेष म्हणजे एकाच दिवसात भाजप प्रवेश केला अन् दुसऱ्याच दिवशी नगरसेवक बनल्याचा वेगळाच रेकॉर्ड त्यांच्या नावावर तयार झाला आहे.

## अमरावतीच्या अंबादेवी संस्थानास तीन एकर जमीन

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील मौजे चिखलदरा येथील श्री. अंबादेवी संस्थान, अमरावती यांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची ३ एकर ८ आर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

चिखलदरा येथील सुमारे साडे सात एकर जमीन १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देण्यात आली होती. पण ही जमीन वापराविना पडून होती. दरम्यान, अमरावतीच्या श्री अंबादेवी संस्थान यांनी चिखलदरा येथील देवी पॉईंट आणि विराट देवी देवस्थान यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या संस्थानाने या दोन्ही देवस्थानच्या विकासासाठी शासनाकडे जमिनीची मागणी केली आहे. त्यानुसार पर्यटन विकास महामंडळाकडील सुमारे तीन एकर ८ आर जमीन शासन जमा करून घेऊन, ती श्री. अंबादेवी संस्थानास विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही जमीन मंदिर संस्थानाला भोगवटादार वर्ग – २ म्हणून मिळणार असून, जमीन केवळ धार्मिक प्रयोजनासाठी वापरता येणार आहे.

## मुंबईचा उत्तर भारतीय महापौर होईल

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**मुंबई** मुंबई आणि मीरा-भाईंदरमध्ये उत्तर भारतीय महापौर विराजमान होईल. या ठिकाणी उत्तर भारतीय महापौर बसेल इतके नगरसेवक निवडून आणू, असा ठाम विश्वास व्यक्त करत भाजप नेते कृपाशंकर सिंह यांनी ऐन महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना डिवचले आहे.

शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राजकारण मुंबई, मराठी माणूस आणि उत्तर भारतीयांना विरोध करूनच सुरुवात झाले. उत्तर भारतीयांना अनेकदा या पक्षांनी वेगवेगळी कारणे पुढे करत मारझोडही केली. आता ऐन निवडणुकीत पुन्हा एकदा मराठी विरुद्ध उत्तर

### भाजप नेते कृपाशंकर सिंहांचे वक्तव्य

भारतीय हा मुद्दा मुंबईत पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. मराठी माणसा जागा हो, असे म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कृपाशंकर सिंहाना उत्तर दिले आहे. कृपाशंकर सिंह यांनी विशेषतः मीरा-भाईंदर महानगरपालिकेबाबत मोठा दावा केला आहे. उत्तर भारतीय समाजातील व्यक्तीला महापौरपदावर बसवण्यासाठी आवश्यक तेवढे नगरसेवक निवडून आणले जातील, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. उत्तर भारतीय मतदारांची संख्या आणि त्यांचा राजकीय सहभाग लक्षात घेता, हा समाज निर्णायक ठरू शकतो, असा संकेत त्यांच्या वक्तव्यातून मिळतो. स्थानिक पातळीवर संघटन मजबूत करून महापौरपदापर्यंत मजल मारण्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.ष्कृपाशंकर सिंह यांनी केवळ एका महानगरपालिकेपुरता मुद्दा न ठेवता, संपूर्ण महाराष्ट्राबाबत भाकीत केले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांमध्ये महायुतीची सत्ता स्थापन होईल, असा ठाम दावा त्यांनी केला. या विधानामुळे महायुतीकडून निवडणुकांची तयारी जोरात सुरू असल्याचे संकेत मिळतात. विशेषतः मुंबई महानगरपालिका, मीरा-भाईंदरसारख्या शहरी भागांमध्ये सत्ता मिळवण्याचा निर्धार महायुतीने केल्याचे या वक्तव्यातून स्पष्ट होते.




# वेलकम 2026 ; नवीन वर्षात मोठे बदल

वृत्तसंस्था ३१ डिसेंबर

**नवी दिल्ली:** नवीन वर्षात केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांचा पगार आणि निवृत्त लोकांचे पेन्शन वाढू शकते. तर, १ जानेवारीपासून सीएनजी आणि घरगुती पीएनजीचे दर २ ते ३ रुपयांपर्यंत कमी होतील. तथापि, अनेक बचत योजनांवरील व्याज देखील कमी होऊ शकते. याव्यतिरिक्त, १२ लाखांपर्यंतची कमाई करमुक्त होईल. केंद्र सरकारने ८वा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा केली आहे. अद्याप टाइमलाइन सांगितलेली नाही, परंतु असे मानले जात आहे की हा जानेवारी २०२६ पासून लागू होऊ शकतो.

सरकारचे म्हणणे आहे की याचा उद्देश केंद्रीय कर्मचाऱ्यांचे पगार, पेन्शन आणि भत्ते सुधारणे आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना मिळणारी रक्कम वाढेल.समजा, ७व्या वेतन आयोगानुसार सध्या तुमचा मूळ पगार ३५,४०० रुपये आहे, तर यामध्ये ॐ आणि hRA नंतर तो सुमारे ६५,५०० रुपये होतो. तर, ८व्या वेतन आयोगानंतर तो १ लाख १० हजारच्या वर जाऊ शकतो.

हा एक मल्टीप्लायर नंबर आहे, ज्याला सध्याच्या मूळ पगाराने गुणून नवीन मूळ पगार काढला जातो. वेतन आयोग महागाई आणि राहणीमानाचा खर्च लक्षात घेऊन तो निश्चित करतो. पेट्रोलियम अँड नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्ड ने १ जानेवारी २०२६ पासून गॅस वाहतूक शुल्क कमी केले आहे. त्यामुळे देशातील विविध राज्यांमध्ये सीएनजी आणि घरगुती पाईप नॅचरल गॅस (पीएनजी) च्या किमती प्रति युनिट २-३ पर्यंत कमी होतील.ष्आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी नवीन कर प्रणाली अंतर्गत आयटीआर दाखल केल्यास, आता १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागणार नाही. नोकरदार लोकांसाठी ७५ हजार रुपयांच्या स्टॅंडर्ड डिडक्शनसह सूट ?१२.७५ लाख होईल.

### रेल्वे आरक्षणासाठी आधार आवश्यक

१२ जानेवारीपासून ज्या वापरकर्त्यांचे IRCTCed खाते आधारशी लिंक केलेले नाही, ते सकाळी ८ ते रात्री १२ वाजेपर्यंत तिकीट बुक करू शकणार नाहीत. हे नियम केवळ आरक्षित तिकीट बुकिंग सुरू होण्याच्या पहिल्या दिवसासाठी आहेत.आरक्षण ट्रेन सुटण्याच्या तारखेपासून ६० दिवस आधी उघडते. ज्या दिवशी ही बुकिंग उघडते, तोच पहिला दिवस मानला जातो.

### नव्या आयकर कायद्याचा काय फायदा

१ एप्रिल २०२६ पासून नवीन आयकर कायदा २०२५ लागू होईल. हा १९६१ च्या जुन्या कायद्याची जागा घेईल. सरकारचे म्हणणे आहे की नवीन विधेयक कर कायद्यांना सोपे करेल. यामुळे कर दरात कोणताही बदल होणार नाही.आयकर विधेयकात मूल्यांकन वर्षाची जागा 'कर' वर्षाने घेतली आहे. विधेयकाची पाने ८२३ वरून ६२२ पर्यंत कमी झाली आहेत. तथापि, प्रकरणांची संख्या २३ च आहे. कलम २९८ वरून ५३६ पर्यंत वाढवण्यात आले आहेत आणि अनुसूचीदेखील १४ वरून १६ पर्यंत वाढल्या आहेत. क्रिप्टो मालमत्तांना अघोषित उत्पन्नाखाली गणले जाईल.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांच्या घरापुढे 14 जानेवारीपासून आमरण उपोषण

## मोरेश्वर परळीकर यांचा इशारा!

कृषी अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी व्हावी यासाठी कृषी मंत्र्यांकडे ईडीकडे तक्रार दिल्यामुळे कृषी अधीक्षक राहुल सातपुते हे कांदा चाळीत त्रूटी काढून वारंवार त्रास देत असल्याचे मोरेश्वर परळीकर यांनी सांगितले व तशी तक्रार पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, कृषी वित्त राज्यमंत्री आशिष जी जयस्वाल, आमदार प्रताप दादा अडसड, आमदार रवी भाऊ राणा, अमरावती जिल्हाधिकारी यांना व मंगरूळ चव्हाळा पोलीस स्टेशन त्यांना देण्यात आली आहे.

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती** : १०/१२/२०२५ चे पत्रानुसार कांदाचाळी त्रूटी असलेले काम पुर्ण केले आहे तरी जिल्हा कृषी अधिकारी यांनी परळीकर यांचा प्रस्ताव नामंजूर करुन परत पाठविला आहे. त्यामुळे त्यांनी विभागीय कृषी सहसंचालक यांना आपण प्रत्यक्ष पहाणी करुन न्याय देण्याबाबत विनंती केली आहे..

अन्यथा जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते साहेब यांच्या घरासमोर आमरण उपोषण करत असल्याबाबत इशारा दिला आहे..

परळीकर यांचे गट न. २२ मौजा पाचोड तालुका नांदगाव खंडेश्वर येथील शेतात कर्ज काढून कांदा चाळ उभी केली परंतु प्रत्येक वेळेस नवीन त्रुटी काढून कृषी अधिकारी पैशांसाठी त्रास देतात..

पत्रानुसार कांदा चाळीचे काम पुर्ण केले आहे. जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते विनाकारण वारंवार त्रुटी काढून मला त्रास देत आहेत. हे शेतकऱ्यांच्या हितार्थ असणारे अधिकारी मला २ वर्षापासून कांदाचाळ अनुदानापासून वंचीत ठेवत आहेत. शेतकऱ्याचे कोणतेही हित न पाहता नुसते पैशाकरीता तालुका कृषी अधिकारी रोषण इंदोरे साहेब यांनी रु. १५,०००/- चे अनुदान मंजूर करण्यासाठी मागणी केली होती त्यांची तक्रार केली होती. त्यांनी प्रत्यक्ष माझ्या कांदा चाळीची पाहणी केली होती. त्यांनी कोणत्याही त्रुटी बाबत माहिती दिली नव्हती व पैसे दिल्याशिवाय पुर्व संमती दिली नव्हती. त्यामुळे मी अनेक वेळा त्यांच्या कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेट घेवून अनुदान देण्यात यावे अशी मागणी केली.

तसेच याआधी १ वर्षाआधी जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते साहेब यांना प्रत्यक्ष भेटून व त्यांचा सल्ला घेवून डी.ए.पी. व १०:२६:२६ या खताची मागणी करुन त्यांनी आम्हाला बोगस खत रामाफर्टीकेम पुणे या बोगस कंपनीचे खत घेण्याचा सल्ला दिला व माझेवर कार्यवाही केली. त्यामुळे त्यांच्या तक्रारी कृषी मंत्रालयात केल्यामुळे ते या प्रकरणाचा वचका काढण्याचा प्रयत्न करत आहे. वास्तविकतेत कृषी अधिकारीच करोडो रुपये लाच घेऊन बोगस कंपन्यांना खते बनविण्याचा परवाना देतात.. कृषी अधिकारी कंपन्यांची तपासणी करत नाहीत कारण त्यांना आधीच पैसे मिळालेले असते.. व ते खत नंतर मार्केटमध्ये शेतकऱ्यांपर्यंत येते.. व नंतर कृषी अधिकारी छोट्या कृषी केंद्र चालकांवर प्रमोशन व्हावे यासाठी कारवाई दाखवतात, की बघा आम्ही बोगस खते पकडली. वास्तविकतेत कृषी अधिकारीच शेतकऱ्यांची फसवणूक करतात व करोडो रुपये संपत्तीचे मालक बनतात..

## नुतन वर्षानिमित्त वाहतूक व्यवस्थेत बदल

**नागरिकांनी नोंद घेण्याचे आवाहन**

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती** : नवीन वर्षानिमित्त बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे.

आदेशानुसार बुधवारी, रात्री १० ते दि. १ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत शहरातील रस्ते सर्व प्रकारच्या वाहनासाठी बंद राहतील. यात शहरातील उड्डाणपूल, गाडगेबाबा समाधी मंदिरापासून ते शिवाजी शिक्षण संसथा व जिल्हा स्टेडियमकडे जाणारा उड्डाणपूल, इर्विन चौक ते राजापेठ पोलीस स्टेशन, कुथे हॉस्पीटल ते नंदा मार्केट व कुशल ऑटोकडे जाणाऱ्या उड्डाण पुलावरून सर्व प्रकारच्या वाहनाना प्रवेश बंदी राहणार आहे. शहरातील सर्व हलक्या व जड वाहनांची वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पोलीस उपायुक्त यांनी मुंबई पोलीस कायदा १९५१चे कलम ३३(१)(ब), तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ नुसार सदर आदेश निर्गमित केला आहे. या आदेशाची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी केले आहे.

## पर्यावरणाच्या दृष्टीने प्रतिबंधीत चायना मांजा विक्री करणा-या इसमावर धडक कारवाई



प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती** : पोलीस आयुक्त यांनी आदेश दिले होते की, अमरावती शहरात पर्यावरणाच्या दृष्टीने प्रतिबंधीत चायना मांज्याची विक्री मोठ्या प्रमाणात होत असुन त्यामुळे सामान्य नागरीकांच्या जिवीतास धोका उत्पन्न होत असल्याने अश्या अवैध्यरित्या मांजा विक्री करणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त झालेवरून, पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

. ३०/१२/२०२५ रोजी गुन्हेशाखा पथक हे पोलीस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहीती मिळाली की, पिंन्दु चांदेकर नावाचा इसम हा त्याचे राहते घरा समोर बाकळेवाडी सिलांगण रोड येथे पर्यावरणास घातक असलेला शासन प्रतिबंधीत चायना मांजा स्वतः जवह बाळगुण विक्री करण्याचे उद्देशाने उभा आहे. अशा माहीती वरून बाकळेवाडी येथील राहाणार इसम नामे भुषण उर्फ पिन्टु मनोहरराव चांदेकर वय ४० रा. बाकळेवाडी सिलांगण रोड अमरावती हा त्याचे राहते घरा समोर एक पिशतुन पर्यावरणास घातक असलेला शासन प्रतिबंधीत चायना मांजा वे चकर्या लोकांना विकी करण्याचे उद्देशान मिळुन आला. त्याचे ताब्यातुन १) १२ नग मोनो फायटर केटीसी कंपनीच्या वायना मांजाच्या चक्रया कि.अं. प्रत्येकी १००० रू असा एकूण १२,०००/- रू, चा मुद्देमाल मिळुन आल्याने नमुद आरोपी भुषण उर्फ पिन्टु मनोहरराव चांदेकर वय ४० रा. बाकळेवाडी सिलांगण रोड अमरावती याचे विरुध्द पोलीस स्टेशन राजापेठ येथे कलम ४९, २२३ बि.एन.एस. सहकलम ५ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

सदर ची कारवाई. पोलीस आयुक्त . राकेश ओला , पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे , पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटेसपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ठेवले, मनोज ठोसर, मंगेश परीमल, संग्राम भोजने, विकास गुडधे, सैयद नईम बेग, सागर ठाकरे, योगेश पवार, यांनी केली आहे.

## भाजपा नेते तुषार भारतीय यांची उमेदवारी दाखल




साई नगर प्रभागात ड या वर्गात भाजपा तर्फे भाजपाचे नेते तुषार भारतीय यांनी उमेदवारी दाखल केली.

## तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थांसाठी विशेष कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती** : भावी पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी आणि जिल्हा तंबाखूमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या तालुकास्तरीय पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी 'तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था' कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

शिक्षण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने 'तंबाखू मुक्त पिढी : शाळांसाठी आव्हान' या विषयाच्या अनुषंगाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये उपशिक्षणाधिकारी, महानगरपालिका शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी शिक्षण, शाळा केंद्र प्रमुख आणि विषय साधन व्यक्ती उपस्थित होते.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या वापराच्या दुष्परिणामांबाबत समाजात आणि विशेषतः लहान मुलांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी शासन स्तरावर निरंतर प्रयत्न सुरू आहेत. ज्यामध्ये शाळा आणि शैक्षणिक संस्था केंद्र व राज्य शासनाच्या निकषांनुसार तंबाखूमुक्त करण्यासाठी रॅली, पोस्टर, घोषवाक्ये, कविता आणि पथनाट्ये यांसारखे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. शाळेच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्री करणे हा दंडात्मक गुन्हा असून १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू विकणे किंवा तसे करण्यास भाग पाडणे हा कठोर शिक्षेस पात्र गुन्हा आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती अंतर्गत प्रत्येक तालुक्यातील शाळांकरिता विशेष पोस्टर्स, बॅनर्स आणि बोर्ड्सचे वाटप करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षक डॉ. मंगेश गुजर यांनी केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या निकषांची माहिती दिली, तर मंगेश गायकवाड यांनी 'तंबाखू नियंत्रण कायदा २००३' बाबत मार्गदर्शन केले. या मोहिमेत शिक्षण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, संभाजी नगर यांनी संयुक्त सहभाग नोंदवला असून, कार्यशाळेतील प्रशिक्षित अधिकारी आता शाळा स्तरावर मुख्याध्यापक व शिक्षकांना मार्गदर्शन व पर्यवेक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत.

## चार चाकी वाहनांची काच फोडुन नगदी रक्कम, लॅपटॉप चारी करणा-या आतंरराज्य टोळीतील एक आरोपी गजाआड

प्रतिनिधी ३१ डिसेंबर



**अमरावती** : चार चाकी वाहनांची काच फोडुन नगदी रक्कम, लॅपटॉप चारी करणा-या आतंरराज्य टोळीतील एक आरोपी गजाआड केले. आयुक्तालय हददीतील एकूण ४ गुन्ह्याचीं उकल अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई केली. २१ डिसेंबर २०२५ रोजी पोलीस स्टेशन राजापेठ व सिटिकोतवाली हद्दीत चार चाकी वाहनांचे काच फोडुन नगदी रक्कम व लॅपटॉप चोरी झाल्याच्या लागोपाठ चार ते पांच घटना घडल्याने पोस्टे राजापेठ व सिटिकोतवाली येथे सदर घटने बाबत पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदरचे गुन्हे हे विशेष पद्धतीने (मोडस) केल्याचे असल्याचे निदेर्शनास आल्याने सदर गुन्हे एका विशेष टोळी कडुन करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निषप्न झाल्याने गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संदीप चव्हाण यांनी गुन्हे शाखेचे पथकासह घटनास्थळांना भेट देउन गुन्ह्यांसंबंधी सविस्तर माहीती घेवुन गुन्हे शाखेचे सपोनि वाकोडे यांचे पथकाला सदर गुन्हे बाबत मार्गदर्शन करुन गुन्हे उघड करण्याबाबत आदेशीत केले होते.

सदर गुन्ह्यातील आरोपीतांची गुन्हा करण्याची पद्धत हि विशिष्ट स्वरुपाची अल्याने घटनास्थळावरुन फुटेज प्राप्त करुन अश्या प्रकारचे गुन्हो करणा-या आंतरराज्यीय गुन्हेगारांबाबत माहीती प्राप्त केली असता सदरचा गुन्हा हा नंदुरबार येथील नायडु गैंग चे टोळीतील आरोपीतांनी केले असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीतांची तात्रीक पद्धतीने माहीती प्राप्त करुन सदर आरोपी आरोपी याला बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात फिरत असल्याची माहीती प्राप्त झाल्याने सापळा रचुन सदर आरोपी नामे कार्तीक बालु नायडु वय २७ वर्षे रा. वाकीपाडा पोस्टे करंजी खुर्द तालुका / पोलीस स्टेशन नवापुर जि. नंदुरबार यास ताब्यात घेण्यात आले.

## क्रीडा स्पर्धांचे ५ ते ७ जानेवारी दरम्यान आयोजन

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती:** सन २०२५-२६ या वर्षातील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय, अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती विभागामार्फत करण्यात येणार आहे. ही क्रीडा स्पर्धा दि. ५, ६ व ७ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार आहे. या संदर्भात या कार्यालयाच्या स्तरावरून विविध समित्या गठीत करण्यात आल्या असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांनी दिली आहे.

## आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन!

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अमरावती,:** जिल्ह्यातील रिक्त ठिकाणी आधार नोंदणी केंद्रांचे वाटपाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती मार्फत करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मान्यता प्राप्त व सुरू असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज स्वीकृतीची तारीख दि. ३१ डिसेंबर २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ ही आहे.

वलगांव, तालुका अमरावती-१, आसरा, तालुका भातकुली-१, मंगरूळ चव्हाळा, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, लोणी, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, घुईखेड, तालुका चांदुर रेल्वे-१, जुना धामणगांव, तालुका धामणगाव-१, वऱ्हा, तालुका तिवसा-१, हिवरखेड, तालुका मोर्शी-१, लोणी, तालुका वरूड-१, पुसला, ता. वरूड-१, बेलोरा, ता. चांदुर बाजार-१, रासेगांव, ता. अचलपूर-१, वडनेर गंगाई, ता. दर्यापूर-१, भंडारज, ता. अंजनगांव सुर्जी-१, धुलघाट, ता. धारणी-१, हरिसाल, ता. धारणी-१, गौलखेडा, ता. चिखलदरा-१, टेंब्रुसोंडा, ता. चिखलदरा-१, असे एकुण १८ नवीन आधार केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

# खामगाव

## रब्बीचे पीक कर्ज वाटप केवळ 15 टक्के पीक कर्ज वाटपाची गती वाढवणे गरजेचे

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**बुलढाणा** : खरीप हंगामातील नुकसान भरून निघावे यामुळे जिल्ह्यातील शेतकरी रब्बी हंगामाकडे लक्ष ठेवून आहे. निर्धारित क्षेत्रापैकी ८५ टक्के पेरणी पूर्ण झाली, परंतु आवश्यक पीककर्ज अत्यल्प प्रमाणात दिले गेले आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ साठी जिल्ह्यात ५८ हजार शेतकऱ्यांना एकूण ५०० कोटी रुपयांचे पीककर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट आहे; मात्र ३० डिसेंबरपर्यंत प्रत्यक्षात फक्त ७,७९० शेतकऱ्यांनाच १३२ कोटी ६५ लाख रुपयांचे कर्ज मिळाले आहे. म्हणजेच, आतापर्यंत केवळ १३ टक्के शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी कर्ज उपलब्ध झाले आहे.

जिल्ह्यात यंदा कृषी विभागाने ३,२९,८०३ हेक्टर क्षेत्रावर रब्बी पेरणीचे नियोजन करण्यात आले होते. डिसेंबरअखेरपर्यंत २,७९,४२५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली असून, हा आकडा समाधानकारक मानला जात आहे. पावसाळ्यात झालेल्या जोरदार पावसामुळे जलसाठे भरले, विहिरींना पाणी आले आणि त्याचा फायदा रब्बी पिकांना झाला.

पीकनिहाय पाहिले तर, हरभरा आणि गहू यंदाह शेतकऱ्यांच्या पसंतीस केंद्रस्थानी आहेत हरभऱ्याचे क्षेत्र सर्वाधिक असून सुमा ७९,८९२ हेक्टर इतके आहे त्याखालोखाल गहू आणि मका येतात तुलनेने तेलवर्गीय व कडधान्य पिकांचा पेरा घटलेला आहे. करडई व सूर्यफुलाचे क्षेत्र अत्यल्प राहिले असून, काही पिके केवळ नावापुरतीच पेरली गेली आहेत शासनाने अनुदान जाहीर केले असले तरी बाजारभाव, जोखीम आणि उत्पादन खच्च लक्षात घेत शेतकरी सुरक्षित पिकांकडेच वळत असल्याचे दिसते.

## म्हशी चोरणाऱ्या तिघांना ग्रामस्थांनी पकडले !

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**खामगाव** : नांदुरा तालुक्यातील हिंगणे गव्हाड येथे शेतातील टीन शेड मधून दोन म्हशी चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना ग्रामस्थांनी २९ डिसेंबर रोजी पकडले. याप्रकरणी नांदुरा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र रघुनाथ गावंडे (५२, रा. हिंगणे गव्हाड) हे शेती व पशुपालन व्यवसाय करतात. त्यांनी दुपारच्या सुमारास दोन म्हशी शेतातील टिन शेडमध्ये बांधून ते घरी परतले होते. त्याचवेळी शेताशेजारी राहणारे विकास भिवटे यांनी भ्रमणध्वनीद्वारे टीन शेडजवळ विना नंबरचे मालवाहू वाहन उभे असल्याची माहिती दिली. त्यानंतर गावंडे यांनी इतर ग्रामस्थांना सोबत घेऊन शेताकडे धाव घेतली, शेतात पहुचल्या नंतर तिघे आरोपी दोन्ही म्हशींचे दोर कापून त्या चोरण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले. ग्रामस्थांनी आवाज दिल्यानंतर आरोपींनी म्हशी तिथेच सोडून पळ काढला; मात्र फिर्यादी व ग्रामस्थांनी पाठलाग करून मोमीनाबाद गावाजवळ तिघांनाही पकडले. तक्रारीवरून पोलिसांनी अर्जुनसिंह बब्बुसिंह ठाकूर (वय ३७, रा. खबरा, जि. जबलपूर), प्रवीण कैलास काळे (वय ३०) व नयनाबाई बंकट भोलाना (वय ५९, दोघेही रा. जलवा बु, ता. पुनासा, जि. खंडवा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ६२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## पिंप्री येथे अल्पवयीन मुलीची आत्महत्या

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**खामगाव** : तालुक्यातील पिंप्री येथे एका अल्पवयीन मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. श्रुती नितीन लोखंडे (१५) हिने राहत्या घरात दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे आढळून आले. ही घटना २९ डिसेंबर रोजी पहाटे उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच, खामगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

## नऊ दिवसांनंतर पूर्णा नदीत सापडला युवकाचा मृतदेह

### ओम साई फाउंडेशनच्या मदतीने शोधमोहीम यशस्वी

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**खामगाव** : नांदुरा तालुक्यातील रोटी येथे कामानिमित्त वास्तव्यास असलेले हरिभाऊ हरमकार (वय ४०, मूळ रहिवासी निंबोरा) हे दि. २१ रोजी पूर्णा नदीत बुडाल्याची घटना घडली होती. त्या दिवसापासून ते बेपत्ता होते. अखेर तब्बल नऊ दिवसांनंतर आज पूर्णा नदीच्या पात्रात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हरिभाऊ हरमकार हे रोटी येथे कामासाठी वास्तव्यास होते. २१ तारखेला ते अचानक बेपत्ता झाल्यानंतर नातेवाईक व ग्रामस्थांनी त्यांचा शोध सुरू केला होता. दरम्यान, रोटी व एरडी गावांच्या दरम्यान असलेल्या संगमेश्वर मंदिराजवळ पूर्णा नदीच्या काठावर त्यांचे स्वेटर व चप्पल आढळून आल्याने ते नदीत बुडाल्याचा संशय अधिक बळावला होता. या घटनेची माहिती मिळताच नांदुरा येथील ओम साई फाउंडेशनचे विलास निंबोळकर व त्यांचे सहकारी, तसेच आपत्ती व्यवस्थापन पथक बुलढाणा यांनी नदीपात्रात शोधमोहीम राबवली. अखेर आज नऊ दिवसांच्या शोधानंतर पूर्णा नदीतून युवकाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. मृतदेह बाहेर काढण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत ओम साई फाउंडेशनने महत्त्वाची भूमिका बजावली.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात रामशक्तीचा दिव्य नाद ५०१ विद्यार्थ्यांच्या विराट शंखनादाने शहर रामनामाने दुमदुमले





प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अकोला:** अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या नवसाकार मूर्तीच्या पुनर्स्थापनेच्या पावन पूर्णतेनिमित्त अकोल्यातील जठारपेठ येथील बिर्ला राम मंदिरात बुधवारी (दि. ३१ डिसेंबर २०२५) भव्य व भक्तीमय धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.या ऐतिहासिक सोहळ्यात सकाळी ठीक ९ वाजता अकोल्याच्या इतिहासात प्रथमच ५०१ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येऊन तब्बल ५० मिनिटांचा विराट शंखनाद केला. शंखांच्या पवित्र नादाने संपूर्ण परिसर रामनामाने दुमदुमून गेला. या दिव्य शंखनादाने वातावरण भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेने भारून गेले होते.

शंखनादानंतर तत्काळ २४ तास अखंड रामनाम जपाला प्रारंभ झाला. ३१ डिसेंबर २०२५ सकाळी ९.०० वाजता सुरू झालेला हा जप १ जानेवारी २०२६ सकाळी ९.०० वाजेपर्यंत अखंडपणे सुरू राहणार आहे. नववर्षाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या नामस्मरणाने करण्याचा हा भक्तीमय उपक्रम भाविकांसाठी विशेष आध्यात्मिक अनुभूती ठरला. बिर्ला राम मंदिरात गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे मंदिराने महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे आध्यात्मिक केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. त्याच परंपरेत महाराष्ट्रात प्रथमच ५०१ विद्यार्थ्यांचा ऐतिहासिक शंखनाद साकार झाल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या पावन सोहळ्याला मोठ्या संख्येने रामभक्तांनी उपस्थित राहून साक्ष दिली. ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे भाविकांनी मनःपूर्वक कौतुक केले.

## शिवनी शिवर मध्ये गॅरेजला आग, प्रचंड हानी



**अकोला :** शिवनी शिवर मध्ये कमान गेट जवळील गॅरेजला सोमवारी मध्यरात्री भीषण आग लागली. आगीत गॅरेज मधील साहित्याची राख रांगोळी झाली. गॅरेज मधील तसेच आजुबाजूच्या लोकांनी आग आटोक्यात आणण्यासाठी पुढाकार घेतला. गॅरेजला लागलेल्या आगीचे कारण कळू शकले नाही. आगीने एकाएकी वेढा दिल्यामुळे सर्वांची तारांबळ उडाली. आग आटोक्यात आणणे आवश्यक होते. प्रसंगावधान राखून ड्रायव्हर दिपक दाने, मो.रिजवान कुरैशी, गोपाल इंगळे, कृष्ण गाडगे, नितीन कोटक्के, प्रशांत संगाड़े, विजय राउत आणि उपस्थितांनी आग आटोक्यात आणण्यासाठी पुढाकार घेतला. बराच वेळाने आग आटोक्यात आली. शिवनी शिवर भागातील नागरिक तसेच येणारे जाणारे देखील गोळा झाले होते. आगीच्या कारणाचा शोध घेतला जात आहे.

## रेल्वे गाड्याचे दहा तासांपूर्वी प्रथम आरक्षण चार्ट

**अकोला:** सर्व रेल्वे गाड्यांसाठी दहा तास आधी प्रथम आरक्षण चार्ट तयार करण्यास मंगळवार, ३० डिसेंबरपासून प्रारंभ होत आहे. यासुविधेचा लाभ देशभरात प्रवाशांना मिळणार आहे. मंगळवारपासून दहा तास आधी तयार होणार असून या सुविधेचा प्रवाशांना लाभ होणार आहे.

सध्या आरक्षणाचा चार्ट रेल्वेगाडी रवाना होण्याच्या आठ तास आधी तयार केला जातो. यामुळे प्रवाशांच्या मनात प्रवासाच्या नियोजनाबाबत अनिश्चितता निर्माण होते. ही अनिश्चितता दूर करण्यासाठी, रेल्वे बोर्डाने प्रवासाच्या दहा तास आधी आरक्षण चार्ट प्रक्रियेस ३० डिसेंबरपासून प्रारंभ करण्यात येणार आहे. सर्व प्रवासी गाड्यांसाठी दहा तास आधी प्रथम आरक्षण चार्ट तयार करण्याची प्रक्रिया मंगळवारपासून अनिवार्य करण्यात येत असल्याचे मध्ये रेल्वेच्या भुसावळ विभागाने कळविले आहे. यासंदर्भातील रिमोट लोकेशनवरील आरक्षण केंद्रांवरील मॅन्युअल प्रथम चार्ट तयार करण्याचे वेळापत्रक निश्चीत करण्यात आले आहे. यामध्ये रेल्वे गाड्यांचे प्रस्थान वेळ पाच वाजून एक मिनिट ते दोन वाजेपर्यंत, प्रथम आरक्षण चार्ट मागील रात्री आठ वाजेपर्यंत तयार करण्यात येईल.

# मार्डी आदिवासी गावात अस्वल व बिबट्याची दहशत

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

### ♦ दोन आठवड्यात दोन गायी व एक बकरी ठार



**अकोट** : अकोट तालुक्या मधील अमरावती व अकोला जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील मार्डी हे गाव जागृत भवानी मातेचे मंदिर व मार्डी धरण म्हणून ओळख आहे

येथील शेतकरी वजीर लाला मोरे यांच्या शेतातील गाईला बिबट्याने हल्ला करून जाग्यावरच ठार केले या हिंसक प्राणी अस्वल बिबट वाघ यांना गाव वस्तीत शिकारीच्या शोधात संचार वाढला आहे गेल्या पंधरा दिवसापासून अस्वलीचे वास्तव वजीर मोरे मुन्ना व राजकुमार दोन्ही मुलांनी तिला पळून लावले त्याच अगोदर बिबट्याने पिंटूभाऊ महारनर चिंचोणा यांची मोठी बकरी, तुरखेड येथील कपूरचंद सुकळकार यांची मोठी गाय त्यानंतर सोमवार २९ मध्यरात्री ला गाईला ठार केले,वजीर लाला मोरे यांच्या मार्डी व खटकाळी रस्त्यावरील शेत शिवारात गट क्र. २०३ या शेतात १० ते १५ गुराढोरांचा मोठा गायवाडा असून तिथेच त्यांचे राहण्याचे खोपडी सुद्धा आहे कापूस वेचणी करून घरी गेले नेमके त्याच दिवशीला शेतात झोपण्याकरता न आल्यामुळे या बिबटाने गाईला बांधलेल्या खोट्यावरच फडशा पाडला बैल गाय वासरं हे मोठ्या प्रमाणात दोर तोडून हंबरडा फोडत पडाली होती. आदिवासी भाग हा एकमेव शेती व्यवसाय पशुपालन पोट भरणे हा त्यांचा कुटुंबाचा उदरनिर्वाचा मुख्य व्यवसाय आज रोजी त्यांना शेतात पहाडामध्ये ढोरे चराई करण्याकरिता शेतात काम करण्याकरिता गावामधून शाळेमध्ये विद्यार्थ्यांना ने आण करण्याकरिता जीवाची बाजी लावून हा प्रवास जीव धोक्यात टाकून करण्याची वेळ अशा स्वातंत्र काळात आली आहे मुख्य रोडवरील भवानी मातेच्या मंदिर परिसरात याच बिबट्याने मोठा थैमान घालून दहशतीचे वातावरण तयार केले आहे प्रवास करणाऱ्या वाहनधारकावर सुद्धा कितीतरी वेळा हल्ला करण्याचा त्याने प्रयत्न केला प्रशासनाकडून व वन विभागाकडून हिंसक प्राण्यांचा शून्य नियोजनाचा अभाव असल्यामुळे उपाययोजना करू शकले नाहीत व शासनाकडून आदिवासींसाठी ज्या सवलती लाभ देण्यात येतात त्यांचा आजपर्यंत कुठल्याच प्रकारचा लाभ आदिवासींच्या दारापर्यंत पोहोचला नाही त्यामुळे संतप्त आदिवासी वन विभागाच्या विरोधात आज रोष व्यक्त करत आहेत, या वाढत्या दहशतमय वातावरण मध्ये आटोक्यात आणण्याकरता होणारे हल्ले थांबवण्याकरता अस्वल व बिबट्याचा ताबडतोब वन विभागाने ठोस बंदोबस्त करावा नुकसान भरपाई देण्यात यावी असे आदिवासी ओरळ घालत आहेत यावेळी वन प्रादेशिक, वनपाल एस पी राऊत, शहाणूर बीट वनरक्षक पी ए तुरक, दीपक मिस्श्रे वन कर्मचारी सह पणज वैद्यकीय पशुवैद्यकारी श्रीकांत गावंडे यांनी छव विच्छेदनाचा पंचनामा करून अहवाल सादर केला, यावेळी पांडुरंग तायडे, संजय ठाकरे, गौरव मानकर ,आकाश सपकाळ, राजेंद्र मोरे माजी जिप सदस्य ,पत्रकार दिनेश बोचे ,मंगेश निंबोळकार, यांनी उपस्थिती लावली,

# आळंदा येथे शेतकरी शास्त्रज्ञ चर्चा

प्रतिनिधी ३१ डिसेंबर



**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनात कोरडवाहू शेती संशोधन व कृषी हवामानशास्त्र प्रकल्पाच्या माध्यमातून कोरडवाहू शेतकऱ्यांना विविध उपक्रमांद्वारे मार्गदर्शन करण्यात येत आहे. केंद्रीय कोरडवाहू कृषी अनुसंधान संस्थान, हैद्राबादचे संचालक डॉ. व्ही. के. सिंघ यांनी कोरडवाहू शेती संशोधन अवलोकनासाठी नुकतीच भेट दिली. त्यांच्या सोबत डॉ.जे.व्ही.एन.एस. प्रसाद, प्रकल्प समन्वयक हैद्राबाद व डॉ. एस. एस. माने, संशोधन संचालक होते.

भेटी दरम्यान त्यांनी बार्शीटाकळी तालुक्यातील येथे सुरु असलेल्या राष्ट्रीय हवामान संवेदनक्षम शेतीवर आधारित राष्ट्रीय अभिनव प्रकल्पातील लाभार्थी शेतकरी सचिन कोंदणकार, गजानन कोंदणकार, प्रकाश डांगे, महादेव टोपले व महादेव डांगे यांच्या प्रक्षेत्रांना भेटी दिल्या. कोरडवाहू शेतीचे तंत्रज्ञान: बिबीएफ व शेततळे, आंतरपीक पद्धती, जल व मृद संधारण पद्धतीचा अवलंब केल्यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या लाभा बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

डॉ. व्ही के. सिंघ यांनी आळंदा येथे कार्यान्वित कोरडवाहू एकात्मिक शेती पद्धती प्रकल्पातील प्रत्याक्षिकांना सुद्धा भेटी दिल्या. 'शेतकरी शास्त्रज्ञ चर्चा' झाली. डॉ. अनिता चोरे, प्रमुख शास्त्रज्ञ, डॉ. राजेश पातोडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ (जल व मृद संधारण), डॉ. अरविंद तुपे (कृषी हवामानशास्त्रज्ञ), डॉ. एम. एम. गणवीर (वरीष्ठ शास्त्रज्ञ कृषीविद्या), संध्या करवा तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. प्रस्तावना डॉ. अनिता चोरे यांनी केली. डॉ. सिंघ यांनी शेतकऱ्यांना कोरडवाहू एकात्मिक शेती पद्धतीचे महत्व पटवून दिले व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आळंदा तसेच इतर गावाहून आलेल्या शेतकऱ्यांनी कोरडवाहू व कृषी हवामानशास्त्र प्रकल्पामुळे झालेल्या लाभा बद्दल अनुभव व्यक्त केले. हे दोन्ही प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्याकरिता डॉ. माने यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. तुपे यांनी राष्ट्रीय हवामान संवेदनक्षम शेती वर आधारित राष्ट्रीय अभिनव प्रकल्पाबाबत मार्गदर्शन केले. सागर म्हैसणे, संतोष ढोरे, रामेश्वर पाटील या शेतकऱ्यांनी अनुभव व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन डॉ.आर.एस. पातोडे यांनी केले. दरम्यान प्रक्षेत्र भेटीचे दुसरे दिवशी डॉ. सिंग यांनी कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प येथील प्रक्षेत्रास भेट देऊन कोरडवाहू शेती संबंधी सुरु असलेले विविध प्रयोग तसेच संशोधन प्रणाली विषयी माहिती दिली.

# फुले दाम्पत्य सन्मान रॅलीस लाखोच्या संख्येने यावे – संदीप भुस्कट

प्रतिनिधी ३१ डिसेंबर



**अकोट** : १ जानेवारी २०२६ रोजी 'भिडेवाडा ते फुलेवाडा' फुले दांपत्य सन्मान दिन महारॅली चे माळी महासंघा च्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. तरी या महारॅलीत माता भगिनींसह सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे. १ जानेवारी १८४८ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांनी भारतातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा येथे सुरू केली. त्यावेळी फुले दांपत्यांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. याचा इतिहास आपणा सर्वांना ज्ञात आहेच. काळाच्या ओघात भिडेवाडाकडे शासनासह सर्वांचे दुर्लक्ष होत गेले. परंतु दहा वर्षांपूर्वी माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांनी भिडेवाडा ते फुलेवाडा अशी १ जानेवारी फुले दांम्पत्य सन्मान दिन महारॅली काढत या विषयाकडे शासनासह सर्व समाजाचे लक्ष वेधले. आणि भिडेवाडा येथे राष्ट्रीय स्मारक उभारण्याची मागणी केली. त्याचे फलित असे झाले की, शासनाने याकरिता ५० कोटींचा निधी मंजूर केला आणि भिडेवाडा येथे राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. या राष्ट्रीय स्मारकाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन पद्धतीने केले. या समारंभाला अविनाश ठाकरे यांनाही उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले. सद्यःस्थितीत या राष्ट्रीय स्मारकाचे काम वेगाने सुरू झाले आहे. त्यामुळे एकूणच महारॅली, विविध सामाजिक संघटना, सामाजिक व राजकीय नेतेमंडळी आणि सर्व समाज बांधव यांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचा हा परिपाक म्हणावा लागेल आपणास विनंती आहे की, सर्व समाज बांधव व माता भगिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून फुले दांपत्यांना अभिवादन करण्यासाठी १ जानेवारी २०२६ रोजी भिडेवाडा, पुणे येथे सकाळी १० वाजता उपस्थित रहावे. रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन अविनाश ठाकरे राष्ट्रीय अध्यक्ष, अरुण तिखे, प्रदेश अध्यक्ष, महारॅलीचे आयोजक संतोष लोंढे सहआयोजक हिरामण भुजबळ, संयोजक .दीपक जगताप, रवींद्र अंबाडकर,प्रा. नानासाहेब कांडलकर, काळुराम अण्णा, गायकवाड,व मुख्य मार्गदर्शक, वनितातार्ई लोंढे राष्ट्रीय महिला अध्यक्ष, कैलास महाजन भारत माळी ,संतोष जमदाडे ,सौ. शुभांगीताई लोंढे ,प्रा.डॉ. नामदेव कोकोडे ,बापू खलाणे , पोपट माळी ,डॉ. श्रीकृष्ण गोरडे , चंद्रशेखर दरवडे यांनी केले.



प्रभाग १६ डॉ. मुस्कान पंजवाणी यांनी अर्ज दाखल केला आहे.



आशिष पवित्रकार यांनी प्रभाग १३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे.

# अल्पवयीन मुलीची सुटका ;आरोपी पोलीस कोठडीत

**कुटासा** : दहिहांडा पोलीस स्टेशनच्या पथकाने एका अल्पवयीन मुलीसह आरोपीला छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेतले आहे. दिनांक ३१/१०/२०२५ रोजी फिर्यादीने तक्रार नोंदवली होती की त्यांची १७ वर्षीय नात दिवाळीच्या सुट्ट्यांसाठी दहिहांडा येथील नातेवाईकांकडे आली होती. मात्र, सुट्ट्या संपल्यानंतरही ती घरी परत न आल्याने अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली होती. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे, २८/१२/२०२५ रोजी पीडित मुलगी व आरोपी योगेश वाघमारे ( वय २१, रा. हिवरा आश्रम, ता. मेहकर, जि. बुलढाणा ) यांचे लोकेशन छत्रपती संभाजीनगर येथे मिळाले.

# प्रभातची सोयरा, आराध्या राज्यस्तरावर

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

### ♦ विभागीय योगा स्पर्धेत चमकदार कामगिरी



**अकोला :** प्रभात किड्स स्कूलची सोयरा अंधारे व आराध्या घुगे या विभागस्तरीय योगा स्पर्धेत सहभाग घेतला होता. या योगा स्पर्धेत प्रभातच्या दोन खेळाडूंनी आपल्या खेळामध्ये दमदार कामगिरी करून यश संपादीत केल्याने त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय योगा स्पर्धेचे आयोजन नेहरू विद्यालय, नेर, यवतमाळ येथे विभागस्तरीय योगा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विभागस्तरीय सर्वसाधारण योगासन स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलींमध्ये सोयरा अंधारे हिने प्रथम क्रमांक मिळविला तर तालात्मक योगासन स्पर्धेत १४ वर्षामध्ये आराध्या घुगे व सोयरा अंधारे ह्यांनी प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडलच्या मानकरी ठरल्या.

सोयरा अंधारे व आराध्या घुगे ह्या विद्यार्थीनींना प्रभातच्या योगा प्रशिक्षक मयुरी इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका वंदना नारे, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभागप्रमुख स्वप्निल मांदाळे, आशिष बेलोकार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# शहापूर ( रूपागड ) श्री देवी मोती माता यात्रा महोत्सव

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

### ♦ कबड्डी चे दणदणीत सामने, जंगी बक्षीसांची लूट



**अकोट** : अकोट तालुक्यामधील सातपुड्याच्या कुशीत वसलेले शहापूर रूपागड येथील आदिवासी ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री देवी मोती माता मंदिर असून सालाबाद प्रमाणे पौष पौर्णिमेला दि. ३ शनिवार रोज सकाळी ११ वाजता पालखी मिरवणूक निघेल व दुपारी ३ वाजता काला महाप्रसादाचे आयोजन सर्व पंचक्रोशीतील आदिवासी व इतरही भावी भक्तांसाठी केले आहे सायंकाळी ८ वाजता कबड्डी व इतरही सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कबड्डी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटक अमोल दादा मिटकरी आमदार प्रथम बक्षीस २१०००/,तर द्वितीय बक्षीस अंबादास सुरत्ने माजी तंटामुक्ती अध्यक्ष १५०००/,तृतीय बक्षीस गोपाल सोनोणे जीतापूर १००००/,चतुर्थ बक्षीस पुरुषोत्तम गावंडे तंटामुक्ती अध्यक्ष जीतापूर ७०००/, सरपंच राम मंगळे ॲम्बुलन्स सेवार्थ यांच्यातर्फे एकलव्य क्रीडा मंडळ शहापूर किट भेट बक्षीस दिली आहे, विजेते खेळाडूंना प्रोत्साहन पर प्रथम ट्रॉफी स्व.प्रल्हाद पालवे, द्वितीय ट्रॉफी साहेबराव भारसाकळे, तृतीय ट्रॉफी सतीश पवार, चतुर्थ ट्रॉफी मनोहर बारे बेस्ट रेडर ट्रॉफी सुशील घट्रे, बा. बेस्ट डिफेंडर सोनाजी बारे, शिस्त पद्धत संघ ट्रॉफी तुषार सुरत्नने , या सर्व खेळाडूंना अन्नदान करणारे अन्नदाते महेंद्र पवार, प्रदीप पालवे, सुरेंद्र सोलकर, विजय पवार, माणिक पवार, गोपाल झांबरे, बाजीराव मुंडे, अजय सोलकर, अरुण ठाकरे इत्यादी अन्नदाते या कार्यक्रमाला अन्नदान केले आहे, यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम व देवी मातेचे दर्शन व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी व खेळाडूंनी लाभ घ्यावा असे आयोजन सौ सविताताई विनायक सुरतने सरपंच, देवीभक्त राजकुमार नजर केदार यांनी आवाहन केले आहे.

# अल्पवयीन मुलीची सुटका;आरोपी पोलीस कोठडीत

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**कुटासा :** दहिहांडा पोलीस स्टेशनच्या पथकाने एका अल्पवयीन मुलीसह आरोपीला छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेतले आहे. ३१/१०/२०२५ रोजी फिर्यादीने तक्रार नोंदवली होती की त्यांची १७ वर्षीय नात दिवाळीच्या सुट्ट्यांसाठी दहिहांडा येथील नातेवाईकांकडे आली होती. मात्र, सुट्ट्या संपल्यानंतरही ती घरी परत न आल्याने अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली होती. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे, २८/१२/२०२५ रोजी पीडित मुलगी व आरोपी योगेश वाघमारे ( वय २१, रा. हिवरा आश्रम, ता. मेहकर, जि. बुलढाणा ) यांचे लोकेशन छत्रपती संभाजीनगर येथे मिळाले. त्या अनुषंगाने पोलीस पथकाने तात्काळ रवाना होऊन दोघांनाही ताब्यात घेतले आणि दहिहांडा पोलीस स्टेशन येथे आणले. या प्रकरणात पीडित मुलीचा जबाब नोंदवून आरोपीवर कलमान्वये वाढ करून त्याला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपीला ०१/०१/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी (पीसीआर) सुनावला आहे. हा तपास ठाणेदार आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**CHANGE IN NAME**

CHANGE IN NAME my passport number is N6205216
I have change my name
***Old name***
**VASANTRAO SUBHASRAO DESHMUKH**
***New Name***
**VASANTRAO SUBHASHRAO DESHMUKH**
**My Residential Address is At. post : Charangaon tq. patur Dist. Akola 444501**

CNR No.: MHAK06-000000-2025 प्रोसेस क्रमांक/ ४८५७/ २०२५

**जाहीर नोटीस**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

(एम.जे.सी. क. ३५१/२०२५) चौकशी तारीख १२/०१/२०२६

**अर्जदार : १. विलास मोहन रणगीरे, वय ३२ वर्ष रा आकोली जहांगीर, ता. अकोट, जि. अकोला २. सौ. विलासीनी विजय लिलार्वे, वय ४५ वर्ष, रा. हनुमान मंदिर, सुयोग नगर, दारव्हा रोड, यवतमाळ ता. जि. यवतमाळ ३. सौ. शुभांगी नितेश दमाहे, वय ३९ वर्ष, रा. मु. शिवाजी वॉर्ड, ता.आर्वी, जि. वर्धा**

**...विरूध्द...**

**गैरअर्जदार- कोणीही नाही**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील पत्त्यावरील कायम रहिवासी असून अर्जदार क्रमांक १ ते ३ चा भाऊ नामे पंकज मोहन रणगीरे हे दि. १३/०९/२०२५ रोजी आकोली जहाँगीर ता. अकोट जि. अकोला येथे अविवाहित मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क. १ ते ३ व मयत पंकज मोहन रणगीरे यांची आई नामे निर्मला मोहन रणगीरे ह्या दि. ०५/०६/२०१८ रोजी आकोली जहाँगीर ता. अकोट जि. अकोला मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क. १ ते ३ व मयत पंकज मोहन रणगीरे यांचे वडील नामे मोहन प्रल्हाद रणगीरे हे दि. ०८/०५/२००५ रोजी आकोली जहाँगीर ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाले आहेत. मयत पंकज मोहन रणगीरे यांना अर्जदार क. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायालयात स्वतः अथवा वकीला मार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल.
करिता आज दिनांक २६/११/२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहायक अधीक्षक (न्यायीक)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर) अकोट

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५


# भांबरखेडा-झाडगाव-तिवरंग पांदण रस्त्याची 25 वर्षांपासून प्रतीक्षा

## पाच गावांतील शेतकरी-ग्रामस्थांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील भांबरखेडा–झाडगाव–तिवरंग या पांदण रस्त्याची मागणी गेल्या २५ वर्षांपासून शेतकरी व ग्रामस्थांकडून सातत्याने करण्यात येत आहे. मात्र अद्यापही हा रस्ता मंजूर न झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पांदण रस्त्यालगत अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी असून शेतात जाण्या-येण्यासाठी, जनावरे नेण्यासाठी तसेच शेतीमालाची वाहतूक करताना मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस कारखान्यापर्यंत पोहोचविताना मोठ्या अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, तिवरंग गावाजवळ पैनगंगा नदीवर मोठ्या पुलाचे काम सुरू असून हा पूल पूर्ण झाल्यानंतर जगापूर, भांबरखेडा व झाडगाव येथील नागरिकांना मराठवाड्यातील हदगाव व नांदेडकडे जाण्यासाठी हा मार्ग अतिशय जवळचा व सोयीचा ठरणार आहे. त्यामुळे या पांदण रस्त्याचे महत्त्व आणखी वाढले आहे.

भांबरखेडा येथे पहिली ते बारावीपर्यंत इंग्रजी माध्यमाची शाळा असल्याने तिवरंग, झाडगाव, मनूला, मनुला तळणी आदी परिसरातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी हा रस्ता अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.



या पार्श्वभूमीवर भांबरखेडा, झाडगाव, तिवरंग तसेच आसपासच्या चार ते पाच गावांतील शेतकरी व ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे भांबरखेडा–झाडगाव–तिवरंग पांदण रस्ता तातडीने मंजूर करून प्रत्यक्षात उतरवण्याची जोरदार मागणी केली आहे.

# खुनातील फरार आरोपीला अटक

## उमरखेड डिटेक्शन ब्रँचची कारवाई

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**उमरखेड :** खूनाच्या गंभीर गुन्ह्यात सात महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला उमरखेड पोलिसांच्या डिटेक्शन ब्रँच (डीबी) पथकाने हैदराबाद येथून अटक केली आहे. सायबर सेल व गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ही कारवाई दि. २९ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास करण्यात आली.

शेख जिशान शेख मिनाज (वय २४, रा. ताजपुरा वार्ड, उमरखेड) असे अटक करण्यात आलेल्या फरार आरोपीचे नाव आहे. या आरोपीविरुद्ध उमरखेड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल असून तो घटनेपासून फरार होता.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ९ जून रोजी फिर्यादी शेख खालिद शेख अकबर (वय ३५, व्यवसाय वेल्डिंग वर्क्स शॉप, रा. अब्दुल रहमान कॉलनी, उमरखेड) यांच्या तक्रारीवरून उमरखेड पोलीस ठाण्यात अप. क्र. ४२८/२०२५ अन्वये भादंवि कलम १०३(१), १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९० सह कलम ४, २५ भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात पुढे महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ (मोक्का) अंतर्गत कलम ३(१)(i), ३(२), ३(४) वाढविण्यात आली होती. या प्रकरणात यापूर्वी आठ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपी फरार होता. पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे व डीबी पथकाने सायबर सेल, यवतमाळ यांच्या सहकार्याने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गोपनीय माहितीच्या आधारे हैदराबाद येथे जाऊन अत्यंत शिताफीने आरोपीस ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंताम, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत डीबी प्रमुख पो. उपनि. सागर इंगळे, पोलीस शिपाई संघशील टेंभरे, संदीप जाधव, चालक पो.शि. रुद्रा (पो.स्टे. उमरखेड) तसेच सायबर सेल यवतमाळच्या मपोशि पूजा भारस्कर यांचा सहभाग होता. सदर गुन्ह्याचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड हे करीत आहेत.



# मोटारसायकल चोरट्यास अटक; ६ मोटारसायकल जप्त

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**आर्णी :** पोलीस स्टेशन आर्णीच्या गतीशील कारवाईत फक्त २४ तासांतच एक मोटारसायकल चोरटा ताब्यात आला. आरोपीकडून एकूण ६ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या.

पोलीस स्टेशन आर्णीला २७ डिसेंबरला संदीप उत्तम चव्हाण यांनी त्यांच्या हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल चोरी झाल्याची तक्रार दिली होती. तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुद्ध अप.क्र. १०१३/२०२५, कलम ३०३(२) BNS अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीनुसार, आरोपी सचिन संदीप सुकळकर उर्फ आकाश, वय ३२ वर्ष, रा. लाख रायजी, ता. दिग्रस असे निष्पन्न झाले. गुन्हा दाखल होताच अवघ्या २४ तासांत आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरीस गेलेली MH-29-AY-8257 क्रमांकाची मोटारसायकल (किंमत अंदाजे ३०,०००/-) जप्त करण्यात आली. चौकशीत आरोपीने यापूर्वी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर व घाटंजी हद्दीत तीन मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडून जप्त केलेल्या मोटारसायकलींची यादी: हिरो स्प्लेंडर प्लस, हिरो होंडा CD डिलक्स, बजाज बॉक्सर, हिरो होंडा स्प्लेंडर, हिरो सुपर स्प्लेंडर, चोरीस गेलेली मोटारसायकल एकूण मोटारसायकलची किंमत अंदाजे १,८०,०००/- आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंतामणी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक सुरडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक पारडकर, प्रशांत देशमुख, तसेच पोलीस पथकातील बोईनवाड, नितीन वास्टर, चव्हाण, गावंडे, आसिफ खल्लीखाऊ, पातुरकर यांनी केली.



# पांढरकवड्यात भीषण अपघात; दुचाकीस्वार जागीच ठार

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**पांढरकवडा :** पांढरकवडा-यवतमाळ राज्यमार्ग क्रमांक ४४ वर धारणा गावाजवळ शुक्रवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. यात ३६ वर्षीय श्रीकृष्ण नागोराव रामगडे (रा. भिसणी माथड, ता. यवतमाळ) यांचा जागीच मृत्यू झाला.

श्रीकृष्ण रामगडे करंजी येथील सासुरवाडीतून पांढरकवड्याकडे येत होते. त्यांच्या बाळंतिण पत्नीवर पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अडीच वर्षांच्या मुलासह पत्नीला भेटण्यासाठी ते मोटारसायकलने निघाले होते.

अपघात धारणा गावाजवळ सार्वजनिक रस्त्यावर धोकादायकरीत्या उभ्या असलेल्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला त्यांच्या दुचाकीने मागून जोरदार धडक बसल्यामुळे झाला. ट्रॅक्टर-ट्रॉली (क्रमांक MH-29-PC-5726) ला नंबर प्लेट नव्हती तसेच रिफ्लेक्टर व इंडिकेटरही नव्हते. अपघात इतका भीषण होता की श्रीकृष्ण रामगडे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्यांच्या मुलाला किरकोळ जखमा झाल्या. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत केली आणि जखमी मुलाला रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी मृतकाचे वडील नागोराव रामगडे यांनी पांढरकवडा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी BNS कलम २८५ (१) (अ) अंतर्गत गुन्हा नोंदवला असून ट्रॅक्टर चालक अद्याप अज्ञात आहे. उपपोलीस निरीक्षक सचिन रघुपती पुढील तपास करत आहेत. श्रीकृष्ण रामगडे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि नुकतीच जन्मलेली मुलगी अशी कुटुंबीयं आहेत. परिसरात अपघाताची बातमी पसरताच शोककळा पसरली आहे.

# भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित मानवंदना रॅली व प्रबोधनपर कार्यक्रम

## भीमा टायगर सेनेचा पुढाकार

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**पुसद :** भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त भीमा टायगर सेनेच्या वतीने गुरुवारी (१ जानेवारी) पुसद शहरात विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता तीन पुतळ्याजवळ बुद्ध वंदनेने होणार असून त्यानंतर शूर वीरांना मानवंदना देण्यासाठी पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीत ढेमसा नृत्य, बंजारा डफडा नृत्य, महिला लेझीम पथक तसेच लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहे. रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, सुभाष बाबू चौक मार्गे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समाप्त होणार आहे.

सायंकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे प्रबोधन गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून प्रसिद्ध भीमशाहीर सुरज आतिश (टीव्ही. एच. स्टार, नागपूर) यांच्या बुद्ध-भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब शेळके हे राहणार असून उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेश वाढवे उपस्थित राहतील. स्वागताध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. सुनील खाडे यांची जबाबदारी आहे. या कार्यक्रमास भीमरावदादा कांबळे, प्रा. डॉ. प्रशांत वासनिक, संघटनेचे विदर्भ अध्यक्ष विनोद फुलमाळी, डॉ. मोहम्मद नदीम, विनोद शेडे, शितलकुमार वानखडे, ॲड. आरिफ अहमद, भोलानाथ कांबळे, डॉ. शिवाजी भुरके, बुद्धरत्न भालेराव, आनंद भगत, प्रशांत धुळे, विठ्ठल खडसे, रवी ग्यानचंदानी, ॲड. विश्वास भवरे, किशोर मुजमुले, भारत कांबळे, मारुती भस्मे, गजानन जाधव, करण ढेकळे, पांडुरंग व्यवहारे, अश्विनीताई पुनवटकर, संजय राठोड, विजय बहादुरे, डॉ. शशिकांत इंगोले, नारायण ठोके, आशिषभाऊ काळबांडे, जगदीश सावळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जनार्धन गजभिये व आर. पी. गवई हे करणार असून आभार प्रदर्शन संतोष गायकवाड करतील. ही माहिती भीमा टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष किशोर कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सल्लागार विष्णू सरकटे, जिल्हाध्यक्ष गीताताई कांबळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.



# वंचितचे डॉ. नीरज वाघमारे नगरपरिषद गटनेते म्हणून निवड

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**यवतमाळ :** नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे, एड. आनंद गायकवाड आणि सौ. मीरा रामदास वीर हे नगरसेवक म्हणून निवडले गेले आहेत.

वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत डॉ. वाघमारे यांना गटनेतेपदी निवडावे असा ठराव मंजूर करण्यात आला. त्यानुसार जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी डॉ. नीरज वाघमारे यांची अधिकृतपणे नियुक्ती केली आणि गटनेतेपदी नियुक्तीपत्र प्रदान केले.

यावेळी डॉ. नीरज वाघमारे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक ॲड. आनंद गायकवाड नगरसेवक, मीरा रामदास वीर नगरसेविका, शिवदास कांबळे जिल्हा महासचिव प्रमोद पाटील शहर महासचिव, धनंजय गायकवाड, धम्मवती वासनिक, करूणा मून, करुणा चौधरी, अरविंद दिवे, रामदास वीर, सचिन मनवर, गुणाभाऊ मानकर, सुधाकर वासनिक, उत्तमराव कांबळे, सुधीर खोब्रागडे, दीपक वीर, वासुदेव भारसाकळे, प्रशांत भारसाकळे, अशोक कयापाक, सिद्धार्थ भवरे, शैलेश भानवे, निरंजन खडसे, संगर गायकवाड, महेश वाघमारे इत्यादी उपस्थित होते.



पक्षाचे अधिकृत प्रतिनिधींनी सांगितले की, नगरपरिषदेतील पुढील कारभाराचे मार्गदर्शन गटनेते व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने ठरवले जाईल.

# चिमुकलीचा विनयभंग

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

घरात तीन वर्षीय चिमुकली एकटी असल्याची संधी साधून एका पंचावन्न वर्षीय नराधमाने तिचा वाईट उद्देशाने विनयभंग केला.ही घटना 29 डिसेंबर च्या दुपारी 2.30 वाजताच्या दरम्यान माथा परिसरात घडली.

मारोती नेहारे 55.रा. माथावस्ती, कळंब असे गुन्हे दाखल झालेल्या नराधमाचे नाव आहे. चिमुकलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. फिर्यादी सकाळी 9 च्या दरम्यान तिच्या सासूबरोबर शेतात कापूस वेचण्याकरिता गेलेली होती, त्यावेळी तिची तीन वर्षीय चिमुकली व तिचे आजोबा हे घरी होते. 2 च्या दरम्यान चिमुकली बाहेर खेळताना शेजारी राहणाऱ्या मारोती नेहारे याने चिमुकलीला चॉकलेट देण्याच्या बहान्याने घरात नेले. आणि वाईट उद्देशाने नको ते कृत्य केले. हा संपूर्ण घटनाक्रम शेजारील एका महिलेने बघितल्याने तिने शेतात गेलेल्या चिमुकलीच्या आईला फोन द्वारे माहिती दिली. आणि आरोपीचे घर गाठून दिला आवाज दिला, दरम्यान चिमुकली रडत रडत बाहेर आल्यावर तिने घडलेला संपूर्ण घटनाक्रम आईला सांगितला.घडलेल्या घटनेच्या दिलेल्या तक्रारीवरून आरोपी मारोती नेहारे याच्या विरुद्ध पोकसो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रमोद काळे करीत आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत स्टुडंट्स वेलफेअर स्कूलचे सुवर्णयश

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**उमरखेड :** हिंगोली येथे नुकत्याच पार पडलेल्या ८ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धा २०२५ मध्ये स्टुडंट्स वेलफेअर इंग्लिश मिडीयम स्कूल, दहागाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

या स्पर्धेत ईश्वरी अविनाश जाधव हिने ११ वर्षे वयोगटातील कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत विशेष प्राविण्यासह सुवर्णपदक मिळवले. तिच्या आत्मविश्वासपूर्ण व तांत्रिक खेळाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक झाले.



तसेच श्रीनय शशिकांत आकरे याने १० वर्षे वयोगटातील कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत विशेष प्राविण्यासह सुवर्णपदक पटकावले. उत्कृष्ट तंत्र आणि चपळतेच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

याच स्पर्धेत गायत्री शशिकांत आकरे हिने अवघ्या ८ वर्षे वयोगटात कराटे फाईट प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत विशेष प्राविण्यासह सुवर्णपदक पटकावले. लहान वयात मिळवलेले हे यश प्रेरणादायी ठरले आहे. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष दर्शन अग्रवाल, उपाध्यक्ष नारायण वड्डे, सचिव नितीन भुतडा, सपना अग्रवाल, संस्थेचे व्यवस्थापक आशिष लासीनकर, मुख्याध्यापक एम. पी. कदम व मुख्याध्यापिका पल्लवी पराते यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या मेहनत, सातत्यपूर्ण सराव व शिस्तीचे त्यांनी विशेष कौतुक करत त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे शाळेच्या क्रीडा परंपरेला नवी दिशा मिळाली असून, भविष्यात हे विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# मोकाट जनावरांमुळे उमरखेडकर त्रस्त

## रस्त्यांवरील वर्दळ धोक्यात; प्रशासनाकडे उपाययोजनांची मागणी

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**उमरखेड :** उमरखेड शहरात मोकाट जनावरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठ तसेच वसाहतींमध्ये मोकाट गायी व इतर जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतूक विस्कळीत होत असून अपघातांची भीतीही वाढली आहे.

शहरातील काही भागांत नागरिकांकडून धार्मिक भावनेपोटी गायींना घरातील अन्नपदार्थ खाऊ घालण्यात येतात. मात्र पशुवैद्यकीय व वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता गायींसाठी नैसर्गिक चारा हाच योग्य असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अयोग्य अन्नामुळे जनावरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून अनेक जनावरे आजारी पडत असल्याचेही निदर्शनास येत आहे.



मोकाट जनावरांमुळे वाहनचालक, ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर अचानक जनावरे आडवी आल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. तसेच भाजी बाजार, दुकाने व रहदारीच्या ठिकाणी घाण व दुर्गंधीचे प्रमाणही वाढले आहे. नागरिकांनी धार्मिक भावना जपत गायींच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी व त्यांना केवळ योग्य चारा उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन सुज्ञ नागरिकांकडून करण्यात येत आहे. याचबरोबर नगरपंचायत, नगरपालिका अथवा स्थानिक प्रशासनाने मोकाट जनावरांबाबत ठोस धोरण राबवून गोशाळा, पकड मोहीम व नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी उमरखेडकरांकडून होत आहे.

मोकाट जनावरांवर नियंत्रण न आणल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# घराला आग

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**यवतमाळ :** नागपूर रोडवरील अशोक नगर परिसरातील एका घराला मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत संबंधित घर पूर्णतः जळून खाक झाले असून घरातील फर्निचर, कपडे, विद्युत उपकरणे व इतर साहित्य जळाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. सदर घर सलमान वैदू शेख यांचे असल्याचे सांगण्यात आले. आग इतकी भीषण होती की ती आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे दोन बंब घटनास्थळी दाखल करण्यात आले. पाण्याचा मारा केल्यानंतर काही वेळात आग नियंत्रणात आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून पुढील तपास सुरू आहे.


## जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार-संतोष रामा राठोड रा सेनंद ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुला करीता जितेश संतोष राठोड जन्म/ सचिव ग्रा.पचायत टेभुरदरा ता. महागांव येथे दि. 26/05/2001 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्म नोंद, सचिव. ग्रा.पचायत टेभुरदरा / नगरपंचायत, महागांच येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म / नोंदणी अधिनियम कलम 13 (3) /नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर कले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास दिनांक 15/01/2026 रोजी पर्यंत आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

स्वा./-
तहसिलदार, महागांव

## प्रामाणिकपणा अजूनही जीवंत; मोबाइल केला परत

**अकोट :** समाजात प्रामाणिकपणा अजून ही जिवंत असल्याचा प्रत्यय अकोट शहरात आला आहे. शहरातील पत्रकार स्वप्नील सरकटे यांना अकोट-अकोला मार्गावरील उगवा फाट्यादरम्यान रस्त्यावर पडलेला एक महागडा मोबाईल सापडला. मात्र स्वप्नील सरकटे यांनी आपल्यातील प्रामाणिकपणा दाखवून तो मोबाईल ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केला. पोलिसांनी त्या मोबाइलमधील संपर्काव्दारे मालकाचा शोध घेवून परत केला. सरकटे यांच्या या प्रामाणिकपणाचे परिसरात कौतुक होत आहे.



# अकोला महानगरपालिका निवडणूक 2026, प्रभाग निहाय विविध पक्षांचे उमेदवारी

**अकोला:** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आपल्या ६२ उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. भाजप–राष्ट्रवादी काँग्रेस युतीअंतर्गत ही यादी घोषित करण्यात आली असून, सर्व २० प्रभागांतील (अ, ब, क, ड) उमेदवारांची नावे स्पष्ट करण्यात आली आहेत.

या यादीत अनुभवी नगरसेवकांसह नव्या चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली असून, महिलांना मोठ्या प्रमाणात प्रतिनिधित्व देत भाजपने सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. पक्ष संघटनेतील कार्यकर्त्यांना प्राधान्य देत निवडणूक रणनिती आखण्यात आल्याचे चित्र आहे.

प्रभागनिहाय उमेदवार जाहीर झाल्याने शहरातील राजकीय हालचालींना वेग आला असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. भाजप शहराध्यक्ष, लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांनी सर्व उमेदवारांना शुभेच्छा देत विकास, सुशासन आणि स्थिर प्रशासन हा पक्षाचा अजेंडा मतदारांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले आहे.

भाजप प्रभाग - १ ( ब ) दिपाली राम बोंद्रे यांना उमेदवारी दिली आहे. प्रभाग - २ ( ब ) शरद श्रीराम तुरकर, प्रभाग - २ ( क ) मधून अनिता राजेश चौधरी, प्रभाग - २ ( ड ) नितीन नरेश राऊत यांना उमेदवारी दिली आहे. तर प्रभाग - ३ ( अ ) मधून शशिकला सतीश काळे, प्रभाग - ३ ( ब ) मधून नितू महादेव जगताप, प्रभाग - ३ ( क ) मधून सागर प्रकाशराव शेगोकार, प्रभाग - ३ ( ड ) मधून प्रशांत गोविंदराव जोशी यांना तिकिट दिले आहे. तर प्रभाग - ४ ( अ ) मधून संदीप रामकृष्ण शेगोकार, प्रभाग - ४ ( ब ) मधून शिल्पा किशोर वरोकार, प्रभाग - ४ ( क ) मधून पल्लवी शिवाजी मोरे, प्रभाग - ४ ( ड ) मिलिंद डिगांबर राऊत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रभाग - ५ विद्या सुभाष खंडारे यांना, तर प्रभाग - ५ ( ब ) मधून जयंत रामराव मसने यांना तिकिट घोषित केले. प्रभाग - ५ ( क ) रश्मी प्रशांत अवचार, प्रभाग - ५ ( ड ) माजी महापौर विजय कमलकिशोर अग्रवाल यांना तिकिट दिले आहे. प्रभाग - ६

## भाजपचे ६२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

( अ ) आरती प्रकाश घोगलीया, प्रभाग - ६ ( ब ) हर्षद प्रमोद भांबरे, प्रभाग - ६ ( क ) माजी नगरसेवक राहूल देशमुख यांच्या पत्नी निखिता देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. प्रभाग - ६ ( ड ) पवन महल्ले यांना उमेदवारी घोषित केली आहे. प्रभाग - ८ ( अ ) रंजना शाम विंचनकर, प्रभाग - ८ ( ब ) तुषार महेंद्र भिरड, प्रभाग - ८ ( क ) माधुरी सुनील क्षीरसागर, प्रभाग - ८ ( ड ) राजेश्वर केशव घोटे, प्रभाग - ९ ( ब )ज्योती वसंत मानकर, प्रभाग - ९ ( ड ) हर्षल बाबुराव चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. प्रभाग - १० ( अ )शिवसेनेतून भाजपमध्ये आलेल्या श्रीमती. मंजुषा संजय शेळके यांना उमेदवारी दिली तर प्रभाग - १० ( ब ) वैशाली विलास शेळके, प्रभाग - १० ( क )अनिल देविदास गरड, प्रभाग - १० ( ड ) नितीन मुरलीधर ताकवाले यांना उमेदवारी दिली आहे. प्रभाग - ११ ( ड ) राहुल राजकुमार चौरसिया, प्रभाग - १२ ( अ ) संतोष देवराव डोंगरे, प्रभाग - १२ ( ब )कल्पना संजय गोटफोडे, प्रभाग - १२ ( ड ) अजय रमेशचंद्र शर्मा, प्रभाग - १३ ( अ )विशाल श्रावण इंगळे, प्रभाग - १३ ( ब ) प्राची निलेश काकड, प्रभाग - १३ ( क )सुनिता विजय अग्रवाल, प्रभाग - १३ ( ड )अनिल सुनील मुरूमकार, प्रभाग - १४ ( अ ) दिपाली प्रवीण जगताप, प्रभाग - १४ ( ब )अस्मिता प्रकाश वगारे, प्रभाग - १४ ( क ) गोपाल रघुनाथ मुळे, प्रभाग - १४ ( ड )दिलीप तुळशीराम भरणे यांना उमेदवारी दिली आहे.

प्रभाग - १५ ( अ )हरीश रतनलाल अलीमचंदानी, प्रभाग - १५ ( ब )मनीषा रविंद्र भंसाली, प्रभाग - १५ ( क ) शारदा रणजीत खेडकर, प्रभाग - १५ ( ड )अरविंद प्रल्हाद टाले यांना उमेदवारी घोषित झाली आहे. प्रभाग - १६ ( अ ) सिद्धार्थ रामदास उपर्वट, प्रभाग - १६ ( ब )मधून मुस्कान आशिष पंजवानी, १६ ( ड ) संजय बाबूलाल बडोने यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. प्रभाग - १७ ( ब ) अमोल अवधूत मोहोकार, प्रभाग - १७ ( ड )करण अशोक साहू यांना उमेदवारी घोषित केल्या गेली. प्रभाग - १८ ( अ )सरिता सुनील कांबळे, प्रभाग - १८ ( ब )अमोल सुधाकर गोगे, प्रभाग - १८ ( ड ) दिलीप रामकृपाल मिश्रा, प्रभाग - १९ ( अ )धनंजय गणपत धबाले, प्रभाग - १९ ( ब )गजानन शाळीग्राम सोनोने, प्रभाग - १९ ( क )योगिता गणेश पावसाळे, प्रभाग - १९ ( ड )माधुरी संजय बडोने यांना उमेदवारी भाजपने दिली आहे. प्रभाग - २० ( अ ) मंगेश भगवान झिने, प्रभाग - २० ( ब )शारदा वैकुंठ ढोरे, प्रभाग - २० ( क )सोनाली गणेश अंधारे, प्रभाग - २० ( ड )विनोद मुरलीधर मापारी यांना उमेदवारी भाजपाने दिली आहे.

## वंचितचे उमेदवार

प्रभाग दोन मध्ये वंदना वासनिक, शफीक शाह , हिना कौसर मोहम्मद आसिफ, आणि बुद्धरत्न इंगोले यांना तिकीट दिलं आहे. प्रभाग तीन मध्ये राजू मोरे माणिक शेळके प्रवीण हिवराळे आणि निलेश देव यांना तिकीट दिला आहे प्रभाग चार मध्ये नितेश कीर्तन सल्ला मेश्राम दिलीप सदाशिव यांना तिकीट दिला आहे तर प्रभाग पाच मध्ये विलास रमेश आगरकर आणि शुद्ध धनु पास पगार यांना तिकीट दिला आहे प्रभाग १२ मध्ये आकाश गवई प्रभाग तेरा मध्ये जय रामा तायडे मेघा सुनील शिराळे आणि पंकज देशमुख यांना प्रभाग तेरा मधून तिकीट दिला आहे. त्या प्रभाग १४ मध्ये पराग गवई ,जयश्री बहादुरकर, प्रवीण पातोडे आणि शमशू साबीर यांना तिकीट दिला आहे. प्रभाग एक मध्ये जाकीर खान यांच्याबरोबर सुलताना बी सय्यद मकसूद त्याचबरोबर भुरी बद्दुदीन कालू यांना प्रभाग एक मध्ये तिकीट दिला आहे. प्रभाग क्रमांक सात मध्ये किरण महेंद्र डोंगरे, मोहन येवले, ताहेरा बी मेहबूब आणि महेंद्र डोंगरे यांना तिकीट दिला आहे. प्रभाग क्रमांक नऊ मध्ये चंदू श्रावण शिरसाठ, शमीम परविन कलीम खान पठाण, हजर हुसेन शायद हुसेन यांना प्रभाग नऊ मधून तिकीट दिला आहे. प्रभाग १० मध्ये रिहान प्रवीण मोहम्मद इजाज यांना तिकीट दिले आहे. प्रभाग ११ मध्ये मिलिंद आकोडे, पूजा छगन जयस्वाल आणि सुरेखा मधुकर इंगळे यांना तिकीट दिले आहे. प्रभाग १७ मध्ये देवा दशरथ गावंडे, गणेश श्रीराम कदम यांना तिकीट दिले आहे. प्रभाग क्रमांक १८ मध्ये ॲड. शितल तायडे, सुरेश नारायण कलोरे, सुरेखा पुरुषोत्तम अहिर आणि शेख कासम शेख यांना तिकीट दिला आहे. प्रभाग क्रमांक १९ मध्ये राहुल श्रावण मस्के, धनश्री रमेश सोने आणि रुक्मिणी सुधाकर पवार यांना प्रभाग १९ मधून तिकीट दिला आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार

**प्रभाग १** अ- अ. रहिम अ. कादर पेंटर, १ क- शाजीया रिजवान अजीत अली शाह, १ ड- शेख नाजीम शेख रमजान, २ अ- वैशाली किशोर मानवतकर, ९ अ- अजय रामदास रामटेके, ९ ब- शितल मनोज गायकवाड, ११ अ- नकीरखान अहमदखान, ११ ब- बनोबी शेख कासम मोरवाले, ११ क - समीना परवीन नकीर खान, १२ क - संगीता मदन भगरड, १६ क - नर्गीस परवनी फय्याज खान, १७ अ - शितल संतोष डाबेराव, १७ क - वैशाली सुधीर कहाकर, १८ क - कविता दिलीप देशमुख.

## काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष

**वॉर्ड क्रमांक २ -**
रमेश दीपक नाईक,
**वॉर्ड क्रमांक ६ -**
बुंदले गीताबाई ओमप्रकाश -
पाटोले मकरंद शशिकांत.
**वॉर्ड क्रमांक ८ -**
रविंद्र बालासाहेब नापाडे -
रुपाली महेश इंगळे - अल्ताफ
खान अब्दुल्ला खान
**वॉर्ड क्रमांक ९ -**
राजेश रतन नेचाने - सुनीता
अरविंद मूर्ती - सानिया राजिक
खान - सुनील वासुदेव वानखडे
**वॉर्ड क्रमांक ११ -**
साहिदा बी. शेख मेहबूब मंतवाले
**वॉर्ड क्रमांक १२ -**
संदीप दुर्गादास तायडे
**वॉर्ड क्रमांक १५ -**
संगीता आनंद वानखडे - बुशरा
जवीद तौसीफुद्दीन
**वॉर्ड क्रमांक १६ -**
इशरत हुसेन शाकिर प्रवीण -
अमरीन सदाफ सैयद नाझिम -
मोहम्मद रफीक मोहम्मद
सिद्दीकी
**वॉर्ड क्रमांक १७ -**
बाबा साहेब भुमरे
**वॉर्ड क्रमांक १८ -**
उमेश सुरेश इंगळे - अविनाश
चौहान
**वॉर्ड क्रमांक १९ -**
अमोल उत्तमराव इंगळे -
नंदकिशोर विठ्ठल ठाकरे
- श्रद्धा प्रफुल्ल कोल्हे - पूजा
पंकज गावंडे

वरील सर्व उमेदवार हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांचे अधिकृत उमेदवार असून, महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी आणि कार्याध्यक्ष देवानंद ताले, सैयद यूसुफ अली यांच्या हस्ते त्यांना पक्षाचे महत्त्वाचे दस्तऐवज असलेले फॉर्म 'ए' व फॉर्म 'बी' प्रदान करण्यात आले आहेत. दरम्यान, काँग्रेस पक्षासोबत सुरू असलेल्या पुढील चर्चेनुसार युतीच्या धोरणात्मक निर्णयांतर्गत २ ते ३ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मागे (विड्रॉल) घेतले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही पक्षाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. ही माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे प्रदेश संघटन सचिव जावेद जकरिया यांनी दिली आहे.




## शिवसेना एकनाथ शिंदे पक्ष

**प्रभाग क्र.:-१**
१)मोहम्मद उस्मान मोहम्मद युसुफ २)सीमा विनोद धाडसे ३)संचिता विजय तळेकर ४)विजय शेषराव तळेकर
**प्रभाग क्र :- २**
१)कविता शंकर जयराज २)शुभम दिनकर वडतकर ३)पूनम प्रदीप काशीद ४)दिनकर सूर्यभान रानबावळे
**प्रभाग क्रमांक ३**
अ सुमित पानझाडे ब स्वानंदी पांडे क अनंत चोपडे ड संगीता शुक्ला
**प्रभाग क्रमांक ४**
अ तुषार इंगळे ब साक्षी पुंडकर क सुनिता आढाव ड गणेश गिरी
**प्रभाग ५**
अ इंगळे ब विजय वानखडे
क -- ड जळमकार
**प्रभाग क्रमांक ६**
ब:- चेतन सुरेश पाटील
क:- सौ सारिका रुपेश जयस्वाल ड:- राजेश अरुण जोशी
**प्रभाग क्र :- ०७**
१) राखी मनीष पाटेकर २)विकास सीताराम रामटेके
प्रभाग क्रमांक ८ अ मंगला म्हैसणे ब उज्जैनकर क मंगेश गीते योगेश ढोरे
**प्रभाग क्रमांक ९**
अ लवकेश मोहन लोखंडे ब स्वाती अतुल एडणे क पूजा अंकुश तवर ड किरण आनंदा शिरसाट
**प्रभाग क्र:- १०**
१)अशा मनीष मालगे २) पुजा सागर पूर्णेये ३) प्रफुल गजानन देशमुख ४)पप्पू श्रीराम मोरवाल
**प्रभाग क्र:- ११**
१)निशा सत्यनारायण ग्यारल २)यशवंत पोचन्ना तुमडे प्रभाग १२ अ. गौतम नामदेव कंकाड ब. शीतल संजय अग्रवाल क. उषा जगजीत सिंह विर्क ड. हितेश दलसुख भाई बगथेरिया
**प्रभाग १३**
अ पवन पवार ब क शैला झगडे ड दिलीप नायडू
**प्रभाग १४**
अ सोनल दुर्गे ब पूजा सागर वाघ क प्रवीण वाहुरवाघ ड आशिष सोनोने
**प्रभाग १५**
अ भूषण चौधरी ब नंदा दीपक इंगळे क श्वेता लक्ष्मीकांत बाजड ड समर्थ विजय शर्मा
**प्रभाग क्रमांक १६**
अ - रेणू रवी थनजय ब- वैजयंती राजकुमार मूलचंदानी
क - सौ राजश्री राजकुमार मिश्रा
ड - दर्शन रोशन राज
**प्रभाग क्रमांक १७**
अ - सौ सविता गजानन चव्हाण ब - सौ अंकिता चेतन गुजर क - श्रीमती गीता रमाशंकर मिश्रा ड - श्री राजेश कृपाशंकर मिश्रा
**प्रभाग क्र १८**
१)सपना अश्विन नवले २)बजरंग विकास रोडे ३)अर्चना प्रदीप मुदिराज ४) अश्विन उद्धवराव नवले
**प्रभाग क्रमांक १९**
प्रभाग क्र.:-०१ १)मोहम्मद उस्मान मोहम्मद युसुफ २)सीमा विनोद धाडसे ३)संचिता विजय तळेकर ४)विजय शेषराव तळेकर

## शिवसेना उबाठा उमेदवार

प्रभाग २ अ - शारदा प्रकाश वानखडे, क- प्रियंका प्रेम समुद्रे, ड- मनोज सुधीर वाविस्कर ३ अ-माधुरी सतीश वानरे, ड- रमेश किसन शिंगोकार, ४ अ- प्रविण चोपडे, ब-शांता बळीराम कपले, क- सुरेखा राजेश वरोकार ड- अभय अशोक खुमकर, ५ अ- भारती जयदीप पळसपगार, ब- मनिष विनायक मोहोळ, क- सुनिता सुर्यकांत कापसे, ड- दिपक श्रीराम गवारे, ६ अ - दुर्गा नारायण क्षिरसागर, ब- प्रशांत महादेव मानकर, क- रोहिनी संजय पुल्लेलू, ८ अ - सोनाली दिनेश सरोदे, ब-मनोज अनंतराव पाटील, क- नितीका आकाश कवडे, ड- नितीन रमेश औतकार, ९ अ - जयशन रघुनाथ गुडधे, क-मथुरा अशोक तायडे, १० ब - माधुरी मुकेश देशमुख, क- राहूल गणेशराव वानखडे, ड - निलेश दामोधरराव वानखडे, ११- शहानाज बी अब्दुल बशीर, १२ ड- सागर सुभाषचंद्र भारुका, १३ अ - देवराव अहिर, ब- दामिनी अक्षय नागापुरे, क- दिपाली रमण जानोरकर, ड- गोपाल परमेश्वर बिल्लेवार, १४ अ- ज्योती महेंद्र खिल्लारे, ब- नम्रता प्रमोद धर्माळे, क- जगदीश अवधुत मुरुमकार, ड- मंगेश रामभाऊ काळे, १५ ब- रेखा विजय दुर्गीया, क- कल्पना हनुमंतराव दाहे, ड- लक्ष्मण विशानदास पंजाबी, १७ ब - किशोर श्रीराम अरुळकर, क-सुजाता राजेश चव्हाण, ड- शारदा मुरलीधर सटाले, १८ अ- वंदना लक्ष्मण कांबळे, ब- दत्ता एकनाथ बावस्कर, क - रुपाली सोमा अडगावकर, ड- आशिष सुशील तिवारी, १९ अ -प्रमोद अशोक खंडारे, ब-अजाबराव शामराव उईके, क- सारीका रामेश्वर अडूळकर, ड- प्रतिमा अश्विन पांडेय, २० अ - विजय रामदास इंगळे, ब- सुरेखा मंगेश काळे, क - वर्षा रामेश घोगरे, ड- शंकर भाऊराव लंगोटे, ९ ब- साधना सतिश येवले, १० अ- शितल योगेश गोतमारे.



शिवसेना शिंदे गट प्रभाग क्र. १९ चे उमेदवार - नयना निखिल सुकेडे ठाकूर, अजय इंगोले, सोनाली सतपालसिह राजपूत, संगीता वसंत आत्राम



राष्ट्रवादी शरद पवार गट प्रभाग १९ - सौ पूजा पंकज गावंडे, नंदकिशोर ठाकरे, सौ श्रद्धा पवन कोल्हे, अमोल इंगळे,

# प्रभाग १२ मध्ये शिवसेनेचे सागर भारुका यांची तगडी उमेदवारी

### श्याम बाबा मंदिरापासून उमेदवारी अर्जासाठी निघाली भव्य रॅली

प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अकोला :** अकोला महापालिका प्रभाग क्रमांक १२ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तरुण आणि तडफदार उमेदवार सागर भारुका यांनी शेकडो समर्थकांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी करण्यात आलेले त्यांचे शक्तिप्रदर्शन पाहता, यावेळेस प्रभाग १२ मध्ये शिवसेनेची 'मशाल' धगधगणार असल्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने एकनिष्ठ, तरुण आणि आक्रमक शिवसैनिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सागर भारुका यांना प्रभाग १२ मधून मैदानात उतरवले आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत सागर भारुका यांना त्यांच्या 'होम पिच'वर खेळण्याची संधी मिळाली आहे. समाजसेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या सागर भारुका यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रसंगी, मुंबईहून खास 'वागले की दुनिया' आणि 'ये रिश्ता क्या कहलाता है' या प्रसिद्ध मालिकांमधील अभिनेत्री अंजू जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रभाग १२ मधील श्याम बाबा मंदिरात पूजन केल्यानंतर सागर भारुका यांची भव्य रॅली उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निघाली. या रॅलीमध्ये प्रामुख्याने खालील परिसरातील



नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनिकट, राधे नगर, खोलेश्वर, सावतराम चाळ, रजपूतपुरा, रामदास बागडे चौक, देवी पोलीस लाईन, राधाकिसन प्लॉट, जुना आलसी प्लॉट ,देवराम बाबा चाळ, गांधी रोड, मंगलवारा, लक्ष्मी नगर, आंबेडकर नगर, न्यू आळशी प्लॉट, पत्रकार कॉलनी, संतोषी माता मंदिर, लोहिया जीन येथून रॅली निघाली. या रॅलीमध्ये मातृशक्ती आणि युवकांची उपस्थिती लक्षणीय होती. नागरिकांचा हा प्रचंड प्रतिसाद पाहून सागर भारुका यांनी सर्वांचे आभार मानले. 'सागर भारुका यांच्यासारख्या निष्ठावान कार्यकर्त्यांची महानगरपालिकेत आणि प्रभागाच्या विकासासाठी अत्यंत गरज आहे,' असे मत व्यक्त करत त्यांनी सागर भारुका यांना निवडून देण्याचे आवाहन केले.

# प्रभाग क्रमांक १ मध्ये काँग्रेसचे तगडे पॅनेल रिंगणात





प्रतिनिधी ३१ डिसेंबर

**अकोला :** शहरातील नायगाव या प्रभाग क्रमांक १ मध्ये काँग्रेसचे पॅनेल सर्वात मजबूत असल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी चारही उमेदवारांच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उमेदवारांचा उत्साह वाढवला.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार साजिद खान पठाण यांना ज्या भागातून सर्वाधिक मतदान झाले होते, त्याच प्रभाग क्रमांक १ मध्ये काँग्रेसने यावेळी चारही मजबूत उमेदवार मैदानात उतरवले आहेत. काँग्रेसतर्फे यावेळेस शेख अब्दुल शेख सलीम, माजी नगरसेविका अजरा नसरीन मकसूद खान, शहराचे प्रसिद्ध आर्किटेक्ट सोहेल खान यांच्या पत्नी निलोफर हाशमी सोहेल खान, तसेच प्रसिद्ध समाजसेवक अब्दुल सलाम खान यांना उमेदवारी देऊन प्रभाग १ मधून पूर्ण पॅनेल निवडून आणण्याची तयारी केली आहे. काँग्रेसच्या विचारधारेवर चालणाऱ्या या चारही उमेदवारांनी आपला नामांकन अर्ज दाखल करताना, यावेळी विकासाच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचे आश्वासन दिले. अर्ज दाखल करताना कार्यकर्त्यांची झालेली अलोट गर्दी पाहून शहरात सध्या काँग्रेसच्या या पॅनेलची जोरदार चर्चा रंगली आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये काँग्रेसने उतरवले मजबूत पॅनेल आहे. नामांकन अर्ज दाखल करताना मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. तर काँग्रेस उमेदवार विकासाच्या माध्यमातून प्रभागाला 'नंबर वन' बनविणार आहे.

# शिवसेना नेते मंगेश काळे यांचे प्रभाग १४ मधून नामांकन दाखल

**अकोला :** शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी नगरसेवक मंगेश काळे यांनी नामांकन अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नामांकन अर्ज दाखल केला. मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि समर्थक यावेळी उपस्थित होते जनतेचा आशीर्वाद घेऊन आपण प्रभाग १४ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे असे मंगेश काळे उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना म्हणाले. कारण जनता जे ठरवते ते करून दाखवते यावर माझा विश्वास आहे त्यामुळे जनतेचा आशीर्वाद त्यांनी मागितला. छत्रपती शिवाजी



महाराजांचा जयजयकार करण्यात आला. मागील टर्म मध्ये आपण केलेल्या विकासाच्या भरोशावर आपण मतदारांसमोर जाणार आहोत असे देखील मंगेश काळे म्हणाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774